प्रकरण दुसरे

# तात्यासाहेब कोरे व वारणा सहकारी साखर कारखाना

✽ प्रकरण दुसरे ✽

# तात्यासाहेब कोरे व वारणा सहकारी साखर कारखाना

## सहकार चळवळीची राजकीय पार्श्वभूमी :-

सहकारी चळवळीच्या संदर्भात महाराष्ट्र राज्य हे एक भारतातील प्रगत व यशस्वी राज्य मानले जाते. महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रात विविध संस्था सहकारी तत्वावर कार्यरत असलेल्या दिसतात. त्यात प्रामुख्याने साखर उद्योग, सूत गिरण्या, पतपुरवठा करणाऱ्या ग्रामीण सहकारी संस्था, सहकारी बँका, दुग्ध-व्यावसायिक सहकारी संस्था, कुक्कुटपाल संस्था इ. उल्लेख होतो. या क्षेत्रातील सहकारी संस्थांनी महाराष्ट्राच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक जीवनात महत्त्वपूर्ण स्थान मिळविले आहे. महाराष्ट्रात सहकारी क्षेत्राने विकास कार्यात मक्तेदारी प्रस्थापित केली आहे.

भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर लोणी (अहमदनगर) येथे १९४९मध्ये सुरू झाला व नंतर अनेक क्षेत्रात सहकारी तत्वाची घोडदौड सुरू झाली. आज महाराष्ट्रात सहकार चळवळीचे जाळे तयार झाले असले तरी, सहकार चळवळीमध्ये प्रवरानगर साखर कारखाना हा आदर्श समोर ठेऊन ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी, ग्रामीण भागातील लोकांचे, अर्थिक, सामाजिक, राजकीय प्रश्न सोडविण्यासाठी, ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या. लोकांच्या भागभांडवलावर विविध संस्था निर्माण केल्या आहेत. सहकार चळवळीमध्ये 'सहकार' या संकल्पनेचा ढोबळमानाने असा अर्थ घेतला जातो. 'समान-हितसंबंध, समान संधी आणि सहकार्य या तत्वांचा आधार घेऊन एकत्र आलेल्या लोकांचे ऐच्छिक मंडळ म्हणजे सहकारी संस्था होय''[1] सहकार चळवळीमध्ये

प्रत्येक सदस्य समान मानला जातो 'एक सर्वासाठी आणि सर्व एकासाठी' हे तत्व सहकारी चळवळीत आढळते.

सहकाराविषयी शासनाचे धोरण सर्वत्र सारखेच होते. पण सहकार चळवळ महाराष्ट्रातच भक्कम झाली त्याचे कारण म्हणजे सहकार चळवळीला लाभलेले खंबीर व गतिमान नेतृत्व होय. ही चळवळ महाराष्ट्रात यशस्वी करण्यास नामदार गोखले, वैकुंठभाई मेहता, डॉ.धनंजयराव गाडगीळ, न.चि.केळकर, श्री.विठ्ठलराव विखे पाटील, डॉ.पंजाबराव देशमुख, श्री.यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शंकरराव मोहिते-पाटील, बाळासाहेब देसाई, राजारामबापू , तात्यासाो मोहिते, रत्नाप्पाआण्णा कुंभार, तात्यासाहेब कोरे, शरद पवार, यशवंतराव मोहिते, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, बाळासाहेब विखे-पाटील इ.मातब्बर आणि कार्यक्षम व्यक्तींच्या नेतृत्वाने आणि मार्गदर्शनामुळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळ यशस्वी झाली. देश नुकताच स्वतंत्र झाला होता. वरील सर्व मंडळी तारूण्य अवस्थेत होती, सर्वसामान्य परिस्थितीतून पुढे आलेली ही मंडळी सहकार क्षेत्राकडे वळली, शेतकरी कु टुंबाची पार्श्वभूमी लाभलेली मंडळी सहकारात काम करू लागली. त्यामुळे शेती व्यवसाय केंद्रभूत मानून सहकार चळवळ वाढली.

महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्यामध्ये सहकारी साखर उद्योग हा महत्वाचा आणि प्रमुख घटक आहे. पहिला सहकारी साखर कारखाना १९४९ साली सुरू झाला. या कारखान्याचा अनुभव लक्षात घेऊ न १९६० साली महाराष्ट्रात १३ सहकारी साखर कारखाने झाले. आज १२७ साखर कारखाने महाराष्ट्रात आहेत. आणि त्यात वरचेवर भर पडत आहे. साखर कारखान्याच्या कामाचा प्रचंड विस्तार झालेला आहे. एकूण देशाच्या आणि महाराष्ट्राच्या विकासामध्ये त्या क्षेत्राची महत्वाची भूमिका आहे. साखर उत्पादनाबरोबरच अनेक रासायनिक प्रकल्प उभारले आहेत. तांत्रिक

शिक्षण सुरू केले आहे. अनेक सामाजिक कल्याणाच्या योजना सुरू केलेल्या आहेत. असंख्य ग्रामीण व्यवसायांना हातभार लावला आहे. निरनिराळया सहकारी संस्था उभ्या केल्या आहेत. 'गाळप हंगामात दर कारखान्यामागे सुमारे ५००० लोकांना रोजगार मिळतो. अंदाजे रू.१०० कोटी या उद्योगात गुंतले आहेत. 'आणि प्रतिवर्षी सुमारे रू.३०००/- कोटीची उलाढाल होते. साखर कारखान्याच्या कार्याची परिणामकारकता स्पष्ट होण्यासाठी वरील माहिती दिली आहे.'[२]

प्रचंड सामर्थ्य निर्माण करणारे विकासाचे नवे केंद्र उभे राहते हे लक्षात आल्यावर आणि ते सहकारी माध्यमातून उभे राहते आहे असे पाहिल्यानंतर राजकारणाचा एक आधार म्हणून त्याकडे पाहणे क्रमप्राप्त आहे. विकासाचे राजकारण ही संकल्पना यातूनच पुढे आली, ग्रामीण भागातून पुढे येऊ पाहणाऱ्या नेतृत्वाने या सहकारी साखरेची कास धरून ग्रामीण विकास आणि राजकारण करण्याचा प्रयत्न केला. आणखी एका बाबीची नोंद घेणे आवश्यक आहे. आणि ती म्हणजे देश स्वतंत्र झाल्यानंतर विकासाच्या आराखडयामध्ये सहकार आणि पंचायत राज्यव्यवस्थेला विशेष महत्त्व देण्यात आले. त्यामध्ये अर्थकारणाबरोबर राजकारणही होते. नवस्वतंत्र राष्ट्रातील जनसामान्याचा राजकीय प्रक्रियेमध्ये सहभाग वाढविणे आणि राजकीय व्यवस्था स्थिर करणे हा महत्वाचा उद्देश त्यामध्ये होता. त्यामुळे लोकशाही प्रक्रियेने संस्था चालविणे अपरिहार्य होते. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर देशपातळीवरील हे धोरण लक्षात घेऊ न मा.यशवंतराव चव्हाणांनी सहकारी संस्थांच्या आणि खास करून सहकारी साखर कारखान्यांच्या वाढीकडे लक्ष दिले.

**सहकारी साखर कारखाने व राजकारण :-**

सहकारी संस्थांची उभारणी आणि खास करून सहकारी साखर कारखान्याची उभारणी या बाबतीत जो विचार सर्वसामान्यपणे मान्य केला आहे, तो

आपण पाहिला पाहिजे. यामध्ये धनंजयराव गाडगीळ यांनी पुरस्कृत केलेले आहे. यामध्ये खुले सभासदत्व, एक सभासद एक मत, सभासदांना अल्प नफा वाटणी, सहकाराला लाभ म्हणून प्रगतीला सहाय्य करणाऱ्या सुविधा निर्माण करणे, सामाजिक बदलाला, आधुनिकीकरणाला हातभार इ.गोष्टी गृहीत धरल्या आहेत. सुरूवातीला सर्वसाधारणपणे हेच ध्येय डोळयासमोर ठेऊन समाजाच्या विकासाला आणि परिवर्तनाला सहाय्य करणाऱ्या या सहकारी संस्थांची म्हणजे सहकारी साखर कारखान्यांची जोपासना करण्यात आली व वाढ करण्यात आली. नंतरच्या कालखंडात शासकीय सहानुभूती आणि विकासाच्या नव्या टप्प्यावर जाणाऱ्या ग्रामीण जनतेचा पाठिंबा या आधारे या संस्थांचा प्रचंड व्याप वाढला या संस्थांची ताकदही वाढली. निवडणूकीच्या वेळी होणारी राजकीय वर्तनांची स्पष्टता काही त्यावेळेपुरताच झालेला सभासदांचा मताविष्कार नसतो तर तो सतत चालणाऱ्या राजकीय प्रक्रियेचाच भाग असतो. निवडणूकीच्या निमित्ताने तो अधिक स्पष्टपणे पुढे येतो. साखर कारखान्यांच्या निवडणुकीचा विचार करीत असताना दोन मुद्यांचा विचार करावा लागतो. एक आजूबाजूच्या पर्यावरणामध्ये या निवडणूका होत असतात. म्हणजे जी एकूण सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थिती निर्माण झालेली असते, त्या आजूबाजूच्या बऱ्या वाईट व पर्यावरणाचा परिणाम साखर कारखान्याच्या निवडणुकीवर होतो. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे गेल्या ३५ वर्षांच्या शेतीमधील बदलामुळे खास करून हरित क्रांतीच्या चालनेने जे भांडवलीकरण शेतीमध्ये झाले आहे त्यामुळे ग्रामीण जीवन बदलत असताना एक प्रकारची अगतिकता निर्माण झाली आहे. पैशाच्या आधाराने पुढे येणाऱ्या नव्या नीतिमूल्यांचा प्रवेश झाला आहे. उच्च आणि प्रचंड साधनसामुग्री असणाऱ्या वर्गाने आपली पकड साखर कारखानदारीवर आणि सहकारावर मजबूत केली आहे.

सहकारी साखर कारखान्याच्या सत्तेमध्ये मोठी ताकद असल्यामुळे निवडणूकीच्या आखाडयामध्ये सत्ता आपल्या ताब्यात ठेवण्यासाठीही अनेक वाईट प्रथा

चालू झाल्या आहेत. उदा.जातीचा आणि इतर प्रतिकांचा वापर करण्याची जी चलाखी राजकारणी मंडळी दाखवितात याला साखर कारखान्यातील नेते अपवाद नाहीत. 'मुख्यतः ग्रामीण भागात प्रचार अशास्त्रीय आणि भावनिक हत्यारांचा वापर करून पूर्ण समाजाची मानसिकता बदलविणेचाही प्रयत्न होतो. अस्थैर्याचा बागुलबुवा उभा करून स्थैर्याचा राजदंड वापरण्याचीही परवानगी मागतात. वरील बाबी उघडपणे निवडणूक प्रक्रियेत नसल्या तरी आणि नेते जातीवादी नसले तरी वरील बाबींचा गैरवापर निवडणूकीत केलेला आहे. 'निवडणूकीत पैशाचा आणि इतर साधनांचा वापर ही तर धक्कादायक गोष्ट आहे. प्रचार यंत्रणा, प्रचार कार्यालये, गाडया, जाहिराती आणि कार्यकर्त्यांची व्यवस्था यासाठी लाखो रूपये खर्च केले जातात.

सहकारी साखर कारखाना ही उत्पादकांची सहकारी संस्था आहे. उत्पादकांना आपल्या मालाची योग्य किंमत मिळवून देणे, त्यासाठी त्यावर प्रक्रिया करणे हे सहकारी संस्थेचे मुख्य उद्दिष्ट असते. एकटया उत्पादकाची सौदा करण्याची शक्ती नगण्य असते. त्याशिवाय त्यावर प्रक्रिया करण्यासाठी भांडवली शक्ती नसते. म्हणूनच सामुदायिक प्रयत्नाने त्यावर मात करणे सौदाशक्तीमध्ये वाढ करणे, सामर्थ्य निर्माण करणे व उत्पादित मालाची योग्य किंमत मिळविणे ही सर्व सहकारी साखर कारखाना काढण्यामागील मुख्य उद्दिष्टये आहेत. सहकारी संस्थांचे बहुतांशी सदस्य अल्पभूधारक आहेत. 'इतर राज्याच्या तुलनेत ५ एकराखाली साखर कारखान्याच्या सभासदांची संख्या ज्यादा आहे. आंध्रप्रदेशामध्ये ५६ टक्के, उत्तर प्रदेश ५७ टक्के व महाराष्ट्रात ९३ टक्के आहे.'[४] म्हणजे सहकारी संस्थांचे बहुतांशी सदस्य अल्पभूधारक आहेत.

सहकारी साखर कारखाना उभा राहतो तो अल्पभूधारक सदस्याच्या हितासाठी, मूळ प्रवर्तकांनी कारखाना उभा करण्यासाठी खूप परिश्रम केले यात शंकेला जागा नाही. सहसा असा पुढाकार घेण्यासाठी थोडे तरी आर्थिक व राजकीय सामर्थ्य

असावे लागते. आर्थिक साधनसामुग्री जास्त असलेल्यांना असे कारखाने जास्त फायदे मिळवून देतात. म्हणून त्यांचे हितसंबंध अधिक जागरूक असतात. मात्र कारखान्याला परवानगी मिळते ती राजकीय प्रक्रियेतून. यामुळे त्यांचे व राज्य तसेच केंद्र नेतृत्वाने राजकीय लागेबांधे जुळतात. कारखाना उभा राहिला की फार मोठे आर्थिक हितसंबंध वाढीलां लागतात. नेतृत्व उभे राहते. आर्थिक परिस्थितीमध्ये वाढ कारखान्यामुळे झाली या उपकाराच्या ओझ्याखाली माणूस आपल्या बाजूने उभा राहील व त्याचा उपयोग आपल्याला राजकीय गटासाठी होईल ही अपेक्षा निर्माण होते. कारखान्यामुळे आर्थिक शक्ती मोठया प्रमाणात तयार होते. निष्ठावान कार्यकर्त्यांचा संच मिळतो. अनेक वरिष्ठ राजकीय नेत्यांच्या संबंध येतो त्यामुळे कारखान्याचे मुख्य प्रवर्तक सहकारातील नेतृत्वावर सार्वजनिक राजकारणात भाग घेतात.

आज महाराष्ट्राच्या राजकारणाचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, बहुतेक सर्व राजकीय नेत्याच्या ताब्यात सहकारी संस्था आहेत, त्यामध्ये साखर कारखाने, बँक, पतसंस्था, सुतगिरण्या, दूधसंघ, ग्राहक भांडार इ. समावेश होतो. या संस्थांच्या आर्थिक पाठिंब्यावर राजकारणात भाग घेतला जातो व त्यात ते यशस्वी होतात. दक्षिण महाराष्ट्रात तर प्रत्येक तालुक्यात एक सहकारी साखर कारखाना असे चित्र दिसते. त्यामुळे आमदार, खासदार हे सहकारी चळवळीत मोठे झालेले नेते असतात. या राजकीय सत्तेच्या जोरावर आणखी काही सहकारी संस्थांचा जन्म होतो. त्यामुळे अशा राजकीय नेत्यांची राजकीय पकड अधिक मजबूत होते. म्हणजे त्यांना राजकारणात यशस्वी होण्यासाठी सहकारी संस्था ताब्यात असणे आवश्यक वाटते. आणि ज्यांच्या नेतृत्वाखाली सहकारी संस्था उभ्या आहेत त्यांनी राजकारणात भाग घेतला आहे असे सर्व साधारण चित्र दिसून येते.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

सहकारी चळवळीमध्ये फार मोठे काम करून सुध्दा सार्वत्रिक निवडणूकीपासून अलिप्त असणारी दुर्मिळ व्यक्ती म्हणजे तात्यासाहेब कोरे हे होय. तात्यासाहेब कोरे यांनी सहकार क्षेत्रात भरीव कार्य करून संपूर्ण वारणा खोऱ्याचा कायापालट केला. वा रणेच्या परिसरात हरितक्रांती, श्वेतक्रांती, आर्थिक क्रांती निर्माण केली आहे. असे असून सुध्दा त्यांनी राजकारणात भाग घेतला नाही. तात्यांनी ज्या व्यक्तीच्या बरोबरीने सहकारात काम केले ते रत्नाप्पाण्णा कुंभार, यशवंतराव मोहिते, वसंतदादा पाटील, राजारामबापू पाटील, बाळासाहेब देसाई, शंकरराव काळे इ.सर्व नेत्यांनी राजकारणात भाग घेतला तसेच त्यानंतरच्याही अनेक कार्यकर्त्यांनी सहकारातील आपल्या कामाच्या अनुभवावर राजकारणात भाग घेतला. अनेक व्यक्ती आमदार, मंत्री, खासदार झाले. पण तात्यांना हे सर्व शक्य असताना सुध्दा ते राजकारणात आले नाहीत. केवळ सहकार चळवळीतच काम करण्याचा ध्यास त्यांना लागला होता. १९६३ मध्ये यशवंतराव चव्हाण यांनी तात्यासाहेब कोरे यांना काँग्रेस पक्षाचे आमदारकीचे तिकीट देऊ केले होते. आणि १९६३ च्या काळात काँग्रेस पक्षाची उमेदवारी म्हणजे हमखास निवडून येण्याची चिन्हे होती. तरी सुध्दा त्यांनी पक्षाचे तिकीट घेतले नाही व सार्वजनिक राजकारणापासून अलिप्त राहिले. तात्यांना राजकारणापेक्षा सहकारात जास्त रस होता. त्यांना सहकाराची निकोप वाढ करावयाची होती. आज वारणेची प्रत्येक संस्था ही आदर्श आहे व त्यातून तात्यासाहेबांची दूरदृष्टी दिसून येते. सहकारामुळे ग्रामीण विकास होण्यास फार मोठी मदत होते. आणि तात्यांनी केवळ ग्रामीण विकासासाठी उपयुक्त अशा संस्थांचे जाळे वारणानगरला विणले आहे.

आज वारणानगरला साखर कारखाना, वारणा बँक, वारणा कोंबडी संघ, वारणा दूध संघ, वारणा बझार, शैक्षणिक संस्था, गांधी हॉस्पिटल, वारणा ॲग्रीकल्चर गुडस् प्रोसेसिंग को-ऑप सोसायटी, संवर्धक मंडळ, बालवाद्यवृंद इ. अनेक संस्था स्थापन केल्या आहेत. या सर्व संस्था स्थापन करण्यामागे एकच उद्देश होता तो

म्हणजे ग्रामीण विकासाला चालना मिळावी. तात्यांनी आपल्या नेतृत्वाखाली मोठया प्रमाणात वारणा परिसरात विकास केला आहे. पण कोणताही व्यवसाय उभा करण्यासाठी नेतृत्व हे महत्वाचे असतेच. पण त्याचबरोबर आर्थिक पाठबळ असणे आवश्यक असते. १९५४ साली प्रथम वारणा सहकारी साखर कारखान्याचे काम हाती घेतले. मोठया कष्टाने सर्व कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमाने हा कारखाना उभा राहिला म्हणून इतर सर्व संस्था उभ्या राहिल्या. वारणा सहकारी साखर कारखान्याने प्रत्येक संस्थेला मदतीचा हात दिला आहे. म्हणून वारणा सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीचा इतिहास, प्रगती आणि मार्गदर्शन हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. म्हणून वारणा सहकारी साखर कारखान्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे आणि त्यातून तात्यासाहेबांचे ग्रामीण नेतृत्व दिसून येते.

## वारणा सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीचा इतिहास :-

आजचे वारणानगर दिसते ते ४५ वर्षापूर्वी कसे होते याचा विचार केला तर मन थक्क होते. पण या ओसाड माळावर जे नंदनवन झाले ते तात्यासाहेब कोरे यांच्या उत्तुंग नेतृत्वामुळेच. या नेत्याने अनेक प्रकल्प योजले, राबविले व यशस्वी केले पण हे प्रकल्प सहजासहजी यशस्वी झाले नाहीत त्यात अनेक अडचणी ठायीठायी होत्या. तरीसुध्दा आपल्या प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी उभा केलेला प्रत्येक प्रकल्प देशात एक आदर्श म्हणून ओळखला जातो. या सर्व उद्योगाचा पाया काय असेल तर तो वारणा सहकारी साखर कारखाना लि. वारणानगर. म्हणजेच आजचा 'तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना' होय, हया कारखान्याच्या स्थापनेमागे मोठा इतिहास आहे. देश नुकताच स्वतंत्र झाला होता, त्यावेळीही आणि आजही शेती हाच मुख्य व्यवसाय होता. भारतीय शेती हा एक जुगारच आहे. कारण शेती ही पूर्णतः पाऊसाच्या

पाण्यावर अवलंबून आहे; आणि पाऊस वेळेवर पडला तर शेती मालाला दर योग्य मिळेल का याची शाश्वती नसते.

शेती व्यवसायात गूळ हे हमखास पैसे मिळवून देणारे पीक. पण १९५१ साली गूळाच्या धंदयाला न भूतो न भविष्यति अशी हलकी किंमत मिळाली. त्यामुळे शेती व्यवसायाला हे काळे वर्षच उगवले. ऊसापासून तयार होणारी मुख्यत्वे गूळ किंवा साखर. गूळाच्या मंदीमुळे जर गूळ नाही तर साखर तरी व्हावी म्हणून अनेक शेतकरी कोल्हापूरच्या साखर कारखान्यावर जाऊन धडकले. परंतु कोणताही कारखाना म्हटला तरी त्याला काही मर्यादा येतात. त्यात कोल्हापूर जिल्हयात उसाचे प्रमाण अधिकच गूळ तयार करणे शेतकऱ्यांना परवडणारे नव्हते. तसेच कारखाने नव्हते त्यामुळे साखर नाही. शेतीतील उसाचे काय करायचे? हा एक मोठा प्रश्न होता शेवटी अनेक शेतकऱ्यांनी आपला ऊस पेटवून दिला. त्यात कोडोलीच्या कोरे यांची जमीन (डाग मळा). म्हणजे अत्यंत सुपीक जमीन. 'आमच्या डागमळयात, एकरी १२-१३ गाडी इतका गुळाचा उतारा पडत होता. म्हणजे एकरी २८० ते ३०० ढेपा. आमच्या शेतातल्या उसाची जाडी चांगली होती. उंची तर १४-१५ फूट इतकी होती. यावर्षीही उसाचे पीक देखणे आले होते. पण एवढे चांगले पीक येऊनही उपयोग नव्हता, गुऱ्हाळ लावणेही तोटयाचे होणार होते म्हणून आमचा अत्यंत निरूपाय झाला. शेवटी दुःखी व कष्टी अंतःकरणाने आम्ही आमचा १६ ते १७ एकर ऊस अक्षरशः पेटवून दिला.'[१५]

पण वैशिष्टय म्हणजे त्याचवर्षी साखरेला दर चांगला होता. कारण कोल्हापूरच्या शुगर मिलने फायदा मिळवला होता. याचा विचार तात्यासाहेब करत होते की, गूळ व साखर दोन्ही उसापासून तयार होणारे पण त्यापासून मिळणारा मोबदल्यात फरक कसा? कोल्हापूर जिल्हयातील शेतकऱ्या-शेतकऱ्यामध्ये असा फरक का? कारण ज्या शेतकऱ्याचा उस कारखान्याला दिला त्याला फायदा व ज्याने गुळाला दिला त्याला

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

तोटा का? हा प्रश्न तात्यासाहेब कोरे यांच्या सारख्या लोकांना पडला. याच काळात कोल्हापूरात शेतकरी संघ तात्यासाहेब मोहिते यांच्या नेतृत्वाखाली चांगला चालला होता. हा संघ सहकारी तत्वावर चालत होता. तेव्हा तात्यासाहेब एकदा नव्हे तर अनेकदा तात्यासाहेब मोहिते यांच्याकडे गेले व आपणही सहकारी तत्वावर साखर कारखाना का काढू नये? आपण अनेक सहकारी संस्था काढतो व त्या यशस्वी करतो मग साखर कारखान्याच्या बाबतीतच एवढं काय आहे असे तात्यासाहेब मोहिते यांना कोरे वरचेवर बोलून दाखवत असत.

१९४९ मध्ये महाराष्ट्रातील कृषी अर्थव्यवस्थेत अभूतपूर्व घटना घडली ती म्हणजे अहमदनगर जिल्हयात प्रवरानगर येथे विखे पाटील यांच्या पुढाकाराने सहकारी मालकी तत्वावर महाराष्ट्रात पहिला सहकारी साखर कारखाना सुरू झाला होता. शासनाने हया कारखान्याला चांगलीच मदत केली होती. तेथे वैकुंठभाई मेहता आणि डॉ.धनंजयराव तथा नानासाहेब गाडगीळ यांनी प्रवरानगर हया कारखान्याला चांगली साथ दिली होती. सुरवातीच्या काळात गाडगीळ यांना स्वतः अध्यक्षपद स्वीकारले होते. एकीकडे ऊस पेटवून दिला जात होता. तर विखे-पाटील हयाच ऊसातून साखर तयार करून शेतकऱ्यांना फायदा मिळवून देत होते. याच काळात तात्यासाहेबांना वारणा परिसरात सहकारी साखर कारखाना उभारण्याचा ध्यास लागला होता. म्हणून तात्यासाहेब कोरे, तात्यासाहेब मोहिते, तात्यांचे काही मित्र १९५१ साली प्रवरानगरचा कारखाना पाहयास गेले. विखे-पाटील यांनी कारखान्याचा इतिहास सांगितला.

'प्रवरानगरहून आम्ही परतलो ते भारावलेल्या अवस्थेतच 'वारणा परिसरात सहकारी साखर कारखाना' हे स्वप्न वास्तवात उतरवण्यासाठी पडतील तितके कष्ट उपसावयाचे या भावनेने आम्ही भारावून गेलो होतो. तिकडचे लोक जर सहकारी कारखानदारी उभी करू शकतात तर आपण का नाही? मग आम्ही सर्व कार्यकर्त्यांनी,

तळसंदे या गावी, तिथल्या देवीच्या देवळात एक बैठक घेतली. सहकारी साखर कारखाना उभारण्याचे प्रयत्न सुरू करावयाचे असे या बैठकीत सर्वांनी ठरविले. तात्यासाहेब मोहिते बैठकीचे संचालन करत होते. या प्रयत्नांचा शुभारंभ करण्यासाठी देवीसमोर मुहूर्ताचे नारळ मी आणि तात्यासाहेब मोहिते यांनी फोडले आणि साखर कारखाना उभारण्यासाठी आम्ही वचनबध्द झालो.'[६]

कारखाना काढण्यासाठी भाग भांडवलाची (शेअर) जमा करणे गरजेचे होते, म्हणून तात्यासाहेब, सातव्याचे निवृत्ती विठोजी घोरपडे, गणेश बाबूजी जोशी, दादासाहेब दळवी यांनी वारणा परिसराचा दौरा करून कारखान्याचे महत्त्व पटवून सांगितले. शेतकऱ्यांना कारखान्याचे महत्त्व पटत होते. पण १९५१ साली शेतकऱ्याची आर्थिक स्थिती फारच बिकट असल्यामुळे शेतकऱ्याकडून फारसा प्रतिसाथ मिळत नव्हता. एका शेअरची किंमत १०० रू होती पण अशा बिकट परिस्थितीतसुध्दा एक हजार एकर ऊस क्षेत्राचे भाग भांडवल म्हणजे एक लाख रूपये त्या काळात जमा केले होते. एवढी मोठी रक्कम जमा करणे म्हणजे एक क्रांतीच झाली होती. शेअर खरेदी चालूच होती आणि साखर कारखान्याच्या उभारणीला सुरवात होणार असे वाटत असतानाच एक अकल्पित संकट कोसळले. तात्यासाहेब मोहिते यांच्या शेतकरी संघाचे एक अडत दुकान वडगांव येथे होते. तेथे मुख्य पीक म्हणजे शेंग. विक्री झाल्यावर मालाचे पैसे खरेदीदाराकडून वेळेत मिळत नव्हते म्हणून शेतकरी सहकारी संघाच्यावतीने वडगाव येथे एक तेल गिरणी सुरू केली. त्या गिरणीला शेतकरी संघाकडून सव्वालाख रूपये भांडवल खर्ची टाकले होते. त्यामुळे शेतकरी संघाकडे पैसे कमी पडू लागले. त्यात तेव्हाचे कोडोलीच्या साखर कारखान्याला पैसे पुरविणे संघाला अशक्य होते. त्यात संघामध्ये अंतर्गत पाठिंबा मिळेल की नाही असे शंकास्पद वातावरण निर्माण झाले होते. या सर्व कारणांमुळे मोहिते यांनी तात्यासाहेब कोरे यांना एक मोठा धक्का दिला ते म्हणाले, 'तुमच्या कोडोली सहकारी साखर कारखान्यासाठी मला खूप सहाय्य करण्याची

इच्छा होती. पण आता तेलगिरणीसारख्या काही घटनांनी माझे मन उदासीन झाले आहे. एवढी साधी तेल गिरणी काढली तर त्यात कमर्शियल रिस्क आहे, म्हणून बँक आम्हाला विरोध करते. तुमची खाती का बंद करू नयेत असे म्हणते. आता पुन्हा साखर कारखान्याकडे वळलो तर पुनः तोच त्रास. इतकी वर्षे सहकार क्षेत्रात काम केलं. आता शेवटी वृध्दापकाळात बट्टा लागायला नको. तेव्हा मला त्या जबाबदारीतून तुम्ही मोकळे करा. तुम्ही तुमचे प्रयत्न चालू ठेवा त्यासाठी माझे तुम्हाला मनःपूर्वक आशीर्वाद आहेत. मी जरी प्रत्यक्षपणे कारखान्यातल्या जबाबदारीचा वाटा उचलू शकलो नाही, तरीही अप्रत्यक्ष जे-जे सहाय्य करणे शक्य होईल ते देण्यात मी कुचराई करणार नाही."[७]

हे ऐकून तात्यासाहेबांना धक्का बसला. कारण साखर कारखाना म्हणजे त्या काळात कोटभर रूपयांची उलाढाल म्हणून साखर कारखान्याचा नियोजित प्रकल्प सोडून देण्याची वेळ आली. पण आतापर्यंत जमा केले एक लाख रूपये भांडवल ज्यांचे त्यांना परत करून टाकायाचे असा निर्णय तात्या व त्यांचे मित्र यांनी घेतला. भाग भांडवल जमा करण्यासाठी गावोगाव जाऊन कारखान्याचे महत्त्व पटवून सांगितले होते. पण आता घेतलेले पैसे परत करण्यासाठी गावोगाव जावे लागणार होते. खूप दुःखाने तात्यांनी पैसे परत केले. पण वारणा परिसरात तात्यांच्या हया कार्याबद्दल कौतुक होत होते. कारण पैसे सार्वजनिक कार्यात नेहमी जातच असतात पण ते सार्वजनिक काम पूर्ण झाले नाही तर जमा केलेले पैसे परत मिळण्याची शक्यता नसते. पण तात्यांनी जमा केलेला पैसा पूर्णपणे परत केला होता. हा प्रसंग तात्यांच्या पुढील कार्यात विश्वासाची साक्ष होती. भागभांडवल परत करताना वाईट वाटले पण जणू काही जमिनीत पेरलेले बी होते. ते परत उगवणार होते. पण याची कल्पना तात्यांना नव्हती. असे ते वातावरण होते. कारखाना होत नाही म्हणून तात्या उदास होते पण त्यातून मार्गाचा शोध घेत होते.

राज्यकारभार करणारी मंडळी शेती व्यवसायाशी निगडीत होती. त्यामुळे शासनाने १९५२ साली साखरेवरील नियंत्रण उठविले. त्याचा परिणाम साखरेची मागणी वाढली. हया मागणीचा पुरवठा करण्यासाठी शासनाला परदेशातून साखर मागवावी लागली. त्यामुळे साखर उत्पादनाची तूट भरून काढण्यासाठी भारत सरकारने १९५४ साली देशात नवीन तेवीस साखर कारखाने काढण्यास परवाने दिले. त्यावेळच्या मुंबई प्रांतात साखर उत्पादनाला अनुकूल परिस्थिती होती. त्यामुळे मुंबई प्रांतात बारा साखर कारखाने काढावे असे केंद्र सरकारने सुचविले. त्या कोल्हापूर जिल्हा हा विविध नद्यांचा जिल्हा. ऊस पिक भरपूर. त्यामुळे कोल्हापूर जिल्हयात तीन साखर कारखाने काढण्याचे सरकारने ठरविले. ते म्हणजे बिद्री, कळे व इचलकरंजी. त्यावेळचे कोल्हापूर जिल्हयाचे कलेक्टर म्हणून डॉ.ए.यू.शेख काम पहात होते. ते कुशल व लोकप्रिय प्रशासक होते. तेव्हा वरील तीन ठिकाणची माहिती कळविण्याचे आणि अशीच काही संभाव्य क्षेत्र असल्यास तयांची माहिती मुंबई सरकारला कळवावी असे सांगण्यात आले. या पार्श्वभूमीवर डॉ.शेख यांनी २५ जून १९५४ रोजी कोल्हापूर जिल्हयातील सामाजिक कार्यकर्ते, प्रमुख बागाईतदार आणि सहकारी चळवळीतील प्रमुख कार्यकर्त्यांची एक बैठक बोलवली. त्या बैठकीला तात्यासाहेबांना निमंत्रित करण्यात आले होते. तात्यांच्या सोबत तात्यांचे काही मित्रही त्यावेळी उपस्थित होते. शेख यांनी शासनाची संपूर्ण माहिती बैठकीमध्ये कथन केली आणि बिद्री, कळे व इचलकरंजी या ठिकाणांच्या प्रस्तावाशिवाय आणखी कोणा कार्यकर्त्यांना आपल्या भागासाठी सहकारी साखर कारखान्याचे प्रपोजल सुचवावयाचे असेल व तो भाग ऊस शेतीस अनुकूल असेल तर त्यांचाही विचार करण्यात येईल असे त्या बैठकीत डॉ.शेख यांनी सांगितले.

त्या बैठकीत डॉ.शेख यांच्या आवाहनामुळे तात्यासाहेबांच्या मनामध्ये विचारचक्रे फिरू लागली. १९५२ मध्ये आपण शासनाच्या मदतीशिवाय साखर कारखाना काढण्याचा प्रयत्न केला आणि आता तर शासनाचा पाठिंबा आहे. मग आपण का गप्प

बसावे, असा विचार तात्यांच्या मनामध्ये घोळत होता. पण त्या बैठकीला तात्यांच्या सोबत आलेले काही मित्र मात्र आपण कारखान्याचा प्रस्ताव देवू नये असे सांगत होते. कारण त्यांना १९५२ सालचा अनुभव कटू वाटत होता. पण तात्यांना आपण प्रस्ताव द्यावा असे वाटत होते. अशा परिस्थितीत काय करायचे असा विचार त्यांच्या मनात येत होता. शेवटी त्या बैठकीत तात्यांनी कोडोली साखर कारखान्याचे नाव नोंदवून घ्यायची विनंती केली आणि त्या बैठकीत पाच कारखान्यांचे प्रपोजल (प्रस्ताव) आले. ते म्हणजे कळे, घोटवडे, इचलकरंजी, बाजार भोगाव व कोडोली. हया कारखान्यांच्या कामाना चालना मिळण्याच्या दृष्टीने एक जिल्हा मध्यवर्ती समिती निवडण्यात आली. डॉ.शेख यांनी पाचही साखर कारखाना केंद्रातील कार्यकर्त्यांना अशी अट घातली की ज्या केंद्रातून आठ दिवसाच्या आत शेतकऱ्याचे कारखान्याला भाग-भांडवल घेण्यासंबंधीचे लेखी अर्ज, पाच रूपये शुल्कासह अधिक संख्येने येतील त्यांची शिफारस ते करणार होते. ज्याच्या शिफारसी जास्त त्याचा पहिला क्रमांक लागणार होता. हे तात्यासाहेब कोरे व त्यांच्या सहकाऱ्यांना एक मोठे आव्हान होते. तात्यासाहेबांना १९५२ साली कारखाना उभारण्यासंबंधी केलेले प्रयत्न या कामी मोठे उपयोगी पडले. तात्या व त्यांचे मित्र एवढे राबले की, इतर चार केंद्रापेक्षा भरघोस पाठिंबा लेखी स्वरूपात सादर केला. पावसाळ्याचे दिवस होते, नदयांना पूर आलेले होते, रस्ते चांगले नव्हते अशा आव्हानात्मक परिस्थितीत सुध्दा आठ दिवसात १३१८ इतकी अनुमती पत्रे तात्यांनी जमा केली. ९ जुलै १९५४ रोजी कोडोली येथे साखर कारखान्याच्या संकल्पनेविषयी विचार झाला. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत व वारणा परिसरातील २२ गावचे २३१ शेतकऱ्यांच्या साक्षीने 'दी वारणा को-ऑपरेटिव्ह शुगर प्रोडयुसर्स सोसायटी' ची स्थापना केली आणि या सोसायटीने साखर कारखाना उभारण्यासाठी प्रयत्न करावेत आणि या कार्यासाठी ३० प्रवर्तकांची निवड करण्यात आली.

लेखी अर्ज सर्वात जास्त असल्यामुळे डॉ.शेख यांनी कोडोलीच्या प्रपोजलची, मुंबई सरकारकडे पहिल्या क्रमांकाने शिफारस केली. साखर कारखाने उभारण्यासाठी राज्यसरकारची मंजुरी व मध्यवर्ती सरकारचे लायसेन्स मिळण्याबाबत प्रपोजल अर्ज व फॉर्म 'डी' भरून १५ जुलै १९५९ च्या आत भरून पाठविले पाहिजे असा आदेश डॉ.शेख यांनी दिला. त्यानुसार तात्यांनी सर्व पूर्तता करून दिली. कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊसाचे क्षेत्र किती आहे याचा सर्व्हे करण्यासाठी तात्यांनी त्यांचे जिवलग मित्र गणेश बापूजी जोशी यांच्याकडे काम सोपविले. त्यांनी सर्व्हे केला. त्यावेळी या भागात ३५०० ते ३६०० एकर पिक होते. पुढे १० ऑगस्ट १९५४ रोजी मुंबई सरकारने आय.डी.एल.१७५४ ए हया पत्राद्वारे कारखान्याला मंजुरी दिली. २० ऑगस्ट हा दिवस साखर कारखान्याच्या इतिहासात महत्वाचा होता. कारण या दिवशी ३० प्रवर्तकांच्या समितीची पहिली सभा श्री.शंकरराव माने यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या समितीने चेअरमनपदी 'तात्यासाहेब कोरे' यांची निवड केली. त्यानंतर चार दिवसांनी गुरू-पुष्य नक्षत्राचा सुमूहर्त होता. उद्योगधंदयात, लॅबोरेटरीत मुहूर्त पाहाणे फारस आधुनिकतेचे लक्षण मानलं जात नाही. तरीसुध्दा 'तात्यांनी जीवनात कोणत्याही प्रकल्पाची अथवा कार्यक्रमाची सुरूवात मुर्हूत पाहिल्याशिवाय केलेली नाही. अर्थात तो त्यांच्या श्रध्देचा भाग आहे आणि त्यात कुणी गैर मानण्याचे कारण नाही. परंतु या धार्मिक समजुतीमुळे तात्यांचा स्वभाव पापभिरू बनला आहे. चांगल्या आचरणाला तात्यांच्या वैचारिक जीवनात धार्मिक अधिष्ठान प्राप्त झाले आहे. ही मोठी जमेची बाजू आहे.'[८] अर्थात तात्यासाहेबांचे असे मत होते की केवळ चांगलेपणामुळे कार्य यशस्वी होते असे नाही. तर त्या कार्यात आपली ध्येय, कार्याची आखणी करणे गरजेचे आहे. तरच ते काम यशस्वी होते. मग अशा कारखान्यासारख्या एवढया मोठया कामासाठी तात्यांनी घरातील सर्व लोकांना एकत्र बोलवून घेतले. रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या साक्षीने घरातील सर्व बंधूनी तात्यांना कारखान्याच्या कामासाठी घरच्या जबाबदारीतून मुक्त

करावे अशी विनंती केली. कारण तात्यांनी प्रवरेचा कारखाना पाहिला होता हे फार मोठे काम आहे. तेव्हा या कामात पूर्ण ताकदीनिशी त्यात उतरले पाहिजे असे त्यांचे मत होते. म्हणून सर्व घरच्या मंडळीना ही विनंती केली. त्यांनी संमती दिली. घरच्या मंडळींनासुध्दा आनंद झाला. कारण वारणा परिसराच्या विकासासाठी कोरे घरण्यातील एक व्यक्ती आपले सर्वस्व वेचण्यास तयार आहे.

१९५४ साली तात्या मुक्त होऊन सार्वजनिक झाले. अखेर पर्यंत त्यांनी वारणा परिसराच्या विकासाचा ध्यास घेतला होता. घरच्या जबाबदारीतून मुक्त झाल्यावर त्यांच्या पुढे एकच ध्येय होते ते म्हणजे कारखाना उभा करणे. त्यासाठी भागभांडवल जमा करणे हे अत्यंत महत्वाचे काम आहे आणि ऐवढे मोठे कार्य कोणत्याही एका व्यक्तीकडून होणारे नव्हते. त्यासाठी तात्यासाहेब व त्यांचे खास काही मित्र एकत्र येऊन साखरेच्या धंदयामुळे सर्व शेतकऱ्यांना होणारे फायदे सांगून भाग भांडवल जमा करण्यासाठी प्रचार दौऱ्यास 'साखरे महाराजांची दिंडी' असे असे अभियान सुरू केले. या साखर दिंडीमध्ये, घोरपडे, दळवी, जोशी, चौगुले, कणसे हे होते. त्याचबरोबर बंधू दिनकर उर्फ नाना, येलूरचे रंगराव दादा पाटील, कुरळपचे दत्तात्रय पाटलू-पाटील, कोडोलीचे गोडबोले, रामभाऊ घाटगे, यशवंत पोवार, मांगल्याचे रा.य.पाटील यांची भाग भांडवल जमा करण्यात चांगली मदत झाली.'[१] २६ ऑगस्ट १९५४ रोजी भाग भांडवल जमा करण्यास सुरवात केली. हे काम अखंडपणे साडेतीन वर्षे चालले होते, पहिल्या वर्षी त्यांना अत्यंत त्रास झाला. कार्यक्षेत्रातील ५० गावात सतत पायीच फिरावे लागले. भाग-भांडवल जमा करण्यात एकही दिवस खंड पडू दिला नाही. एवढे त्यांनी त्यांच्या कामात सातत्य ठेवले होते. रोज सकाळी साधारण ८ ते रात्री ११-१२ वाजेपर्यंत ही सर्व मंडळी फिरत होती. दिवाळीसारख्या सणालासुध्दा ही मंडळी घरी नव्हती. कारण सणासुदीचे लोक घरी भेटतील या आशेने साडेतीन वर्षे ते अखंडपणे फिरले. यांना ध्यास एकच तो म्हणजे सरकारी साखर कारखाना उभा करणे. एका शेअरची किंमत

अडीचशे रूपये होती. त्या काळात ही रक्कम शेतकरी वर्गाला मोठी होती. एका गावाचा चार-पाच वेळा दौरा करावा लागत असे. प्रत्येक गावात जावून १० लोक जमले तरी कारखान्याचे महत्व त्या शेतकऱ्यांना पटवून देऊन शेअर घ्यावे अशी विनंती ते करत असत. जनू १९६५ मध्ये संस्थेचे रजिस्ट्रेशन प्रपोजल करावयाचे होते आणि त्या आधी ५ लाख रूपये भाग-भांडवल जमा करण्याची अट होती. २ जून १९५५ रोजी संस्थेचे रजिस्ट्रेशन प्रपोजल पुण्याच्या शासकीय कार्यालयाकडे पाठवले. अखेर ही संस्था १ जून १९२५ च्या सहकारी कायद्यान्वये नोंदला. श्री वारणा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, कोडोली, जि.कोल्हापूर नोंदणी क्रमांक व तारीख जी २७१/२७/९/१९५५[१०] त्यावेळी कारखान्याचे भाग भांडवल ५,६०,९९३ रूपये इतके होते. तत्पूर्वी भारत सरकारकडून एक हजार टनी साखर कारखान्याचा परवाना मिळाला होता.

अजून भाग भांडवल जमा करण्याचे काम चालूच होते. प्रत्येक गावात जावून कारखान्यापासून आपल्या भागाचे कोटकल्याण होणार आहे; तेव्हा जास्तीतजास्त लोकांनी हयामध्ये सहभागी व्हावे असे तात्यासाहेब सातत्याने सांगत होते. साखरे महाराजांची दिंडी सातत्याने साडेतीन वर्षे वारणा परिसरात फिरत होती. साखर उद्योग नुकताच विकास पावत होता. त्यामुळे शासनाचे नियम सातत्याने बदलत होते. या सर्व गोष्टीमुळे या दिंडीला कठीण निर्णय ऐकावे लागत होते. त्यातून या मंडळींना एक प्रकारचे उत्तेजन मिळत असे. शेवटी १४ मार्च १९५६ ला वारणा कारखान्याने दशलक्ष भांडवल रक्कम पूर्तीची बातमी शासनाला कळविली. शासनानेही वारणा कारखान्याला १० लक्ष रूपये दिले. असे एकूण २० लाखाच्या आसपास भाग भांडवल वारणा कारखान्याचे झाले होते. हा प्रताप साखरे महाराजांच्या दिंडीचा होता. कारखान्याच्या प्रवर्तक समितीत एकूण तीस लोक होते. कारखान्याचे पहिले संचालक मंडळ नियुक्त होणार होते. यासाठी तात्यांनी प्रामाणिक आणि तळमळीच्या कार्यकर्त्यांची यादी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

शासनाकडे पाठविली आणि शासनानेही तात्यांनी दिलेली यादी आहे तशीच मान्य केली. कारण तात्यांनी आपल्या विवेकबुध्दीला पूर्ण कौल लावला होता. त्यामुळे शासनाने ती यादी मान्य केली. त्या अगोदर कारखान्याची १ जानेवारी १९५६ रोजी पहिली वार्षिक सभा झाली होती. त्या सभेला डॉ.धनंजयराव गाडगीळ, कर्मवीर भाऊ राव पाटील यासारखे समाजधुरीण त्यावेळी हजर होते. सरकारी प्रशासक पी.डी.कसबेकर, आर.जी.पाध्ये यांच्यासारखी तज्ज्ञ मंडळीसुध्दा हजर होती आणि ज्या मंडळीनी आहोरात्र कष्ट करून तात्यांना साथ दिली ते पहिले सन १९५६ ते १९६१ या काळातील सरकार नियुक्त बोर्ड ऑफ डायरेक्टर्स (संचालक मंडळ) पुढील प्रमाणे आहे. हे मंडळ सरकारने नियुक्त केले असले तरी या सर्व संचालकांची नावे तात्यासाहेबांनी शासनाला पाठविली होती ती अशी -

**<u>पहिले सरकार (शासन) नियुक्त संचालक मंडळ</u>**

| अ.नं. | नाव | गाव | हुद्दा |
|---|---|---|---|
| १) | श्री.विश्वनाथ तथा तात्यासाहेब कोरे | कोडोली | चेअरमन |
| २) | श्री.निवृत्ती विठोजी घोरपडे | सातवे | व्हा.चेअरमन |
| ३) | श्री.बाबासाहेब तात्यासाहेब जाधव | येलूर | संचालक |
| ४) | श्री.राजाराम यशवंत पाटील | मांगले | संचालक |
| ५) | श्री.विश्वनाथ शंकर डोईजड | चिकुर्डे | संचालक |
| ६) | श्री.सिताराम गणपती पाटील | थानापुडे | संचालक |
| ७) | श्री.सखाराम आपदेवबुवा गुळवणी | तळसंदे | संचालक |
| ८) | श्री.पांडुरंग आण्णा पाटील | कोडोली | संचालक |
| ९) | श्री.बाळासाहेब जगौंडा पाटील | किणी | संचालक |
| १०) | श्री.दत्तात्रय चंद्रोबा नरके | कोडोली | संचालक |
| ११) | श्री.दौलतराव यशवंतराव भोसले | मिणचे | संचालक |
| १२) | श्री.व्ही.पी.वर्दे<br>मॅनेजिंग डायरेक्टर दी बॉम्बे स्टेट को-ऑप लि.मुंबई | | |
| १३) | श्री.पी.डी.कसबेकर I.A.S. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ऑफिसर ऑन स्पेशल डयुटी फॉर को-ऑप शुगर फॅक्टरीज, पुणे. | | |
| १४) | कलेक्टर ऑफ कोल्हापूर | | |
| १५) | एक्झिक्युटीव्ह इंजिनियर पी.डब्ल्यु.डी.कोल्हापूर | | |

अशा प्रकारे पहिले सरकार नियुक्त संचालक मंडळ होते. सेक्रेटरी म्हणून श्री.नंदकुमार के.नाईक हे होते. त्यावेळी वारणा सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात एकूण ३९ गावांचा समावेश होता. सभासद - ११११ इतके , ऊसाचे क्षेत्र - ३४६५ एकर होते. या वरील आकडेवारीत पुढील काळात सातत्याने वाढ झाली. वास्तविक तात्यासाहेबांना चेअरमन व्हावयाचे नव्हते. त्यांनी सुरवातीला डॉ.धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता यांनी कोणी तरी अध्यक्षपद घ्यावे अशी इच्छा व्यक्त केली होती. कारण प्रवरानगरच्या पहिल्या साखर कारखान्याचे अध्यक्षपद डॉ.गाडगीळ यांनी भूषविले होते. तेव्हा वारणेचेसुध्दा अध्यक्ष तेच व्हावेत अशी तात्यांची इच्छा होती. पण महाराष्ट्रात अनेक सहकारी साखर कारखाने सुरू होऊ लागले होते. तेव्हा प्रत्येक ठिकाणी या मंडळींना अध्यक्षपद स्वीकारणे शक्य नव्हते. शेवटी ज्या-त्या कारखान्याच्या प्रवर्तकांनी आपल्या अध्यक्षपदाची निवड करावी असे ठरले. तात्यांनी तर भाग भांडवल जमा करताना आहोरात्र कष्ट केले होते. शिवाय भाग भांडवलाच्या ९५% पावत्या तात्यांनी स्वतःच्या हाताने लिहिल्या होत्या. त्यामुळे तात्यांचीच अध्यक्षपदी निवड सर्वांनी एकमताने केली होती. आतापर्यंत कागदोपत्री व्यवहारच चालू होता. येथूनपुढे कारखान्याची जागा निश्चित करण्यासाठी संचालक मंडळाने तीन तज्ज्ञ लोकांची एक समिती स्थापन केली. या समितीने निःपक्षपातीपणाने कारखान्यासाठी कोडोली, पारगाव व कारवे गावाजवळच्या जागांपैकी योग्य ती जागा निवडावी असे काम या समितीकडे सोपविण्यात आले. या तीन व्यक्तींचा अधिकार मोठा होता. या तीन व्यक्तींमध्ये श्री.एन.जी.जोशी व आर.जी.सुळे हे दोघे प्रख्यात इंजिनियर होते आणि

बेलापूर साखर कारखान्याचे चीफ केमिस्ट श्री.आर.जी.पाध्ये हे होते. ही कमिटी नेमण्याचे कारण म्हणजे कारखान्याचे स्थळ जागा निश्चित करण्याचे काम अत्यंत निःपक्षपातीपणे व्हावे हा त्याच्या मागचा उद्देश होता. कारखाना परिसरात ऊसाचे पीक मोठ्या प्रमाणात असावे, वाहतुक खर्च कमी व्हावा, पाण्याची व्यवस्था असावी; असे ठिकाण असावे म्हणून एक समिती असावी त्यामध्ये कोणीही संचालक असू नये किंवा सभासदही असू नये असा आग्रह तात्यासाहेबांनी धरला होता.

आज जिथे कारखाना आहे ती जागा कोडोली व बहिरेवाडी या गावाच्या सीमेवर आहे हा निर्णय समितीने दिला होता. तरीसुध्दा कारखाना स्थापन करणारे तात्यासाहेब हे कोडोली गावचे आहेत. म्हणून त्यांनी ती जागा निवडली असा काही मंडळींचा गैरसमज झाला होता. त्यांचा विरोधही तात्यासाहेबांना सहन करावा लागला होता. शेवटी त्या जागेची निश्चिती करण्यात आली होती. या जागेच्या मालकांशी जमीन खरेदीबाबत वाटाघाटी सुरू झाल्या. 'तात्यांनी त्या जमीन मालकांना म्हटले की तुमच्या या जमिनीवर जो कारखाना उभा राहणार आहे त्या कारखान्यामुळे या भागातील पन्नास गावांच्या शेतकऱ्यांच्या जीवनात त्यांच्या प्रपंचात सुख-समाधान निर्माण होणार आहे. त्यासाठी तुमचा हातभार लागणार आहे. म्हणून तुम्ही स्वखुशीने अल्प मोबदल्यात, योग्य मोबदल्यात तुम्हास जमेल त्या प्रकारे कारखान्यासाठी जमिनी दया'[११] जमीन मालकांनाही परिसराच्या उन्नतीसाठी आपल्या जमिनी देण्याचा निर्णय जाहीर केला या सर्व जमिनी माळरानाच्या होत्या तसेच बहुतेक मालक हे धनगर समाजातील होते. जमिनी मालकांच्या होत्या तरी सुध्दा मेंढरांना चाऱ्यासाठी त्या जमिनी उपयोगी पडत होत्या. तरीसुध्दा भागाच्या विकासासाठी त्यांनी त्या जमिनी ७५ रूपये एकर याप्रमाणे प्रारंभी १२६ एकर ३२ गुंठे जमीन खरेदी करण्यात आली. पुढे त्याला जोडून आणखी काही जमीन खरेदी करण्यात आली. अशी एकूण १६० एकर जमीन खरेदी करण्यात आली. एवढया कमी मोबदल्यात एवढी जमीन घेणे संचालक मंडळाला

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

पटेना म्हणून तात्यांनी एकरी २५ रूपये अधिक देण्यात येतील, पण वरील रक्कम भाग रूपाने देण्यात येईल असे तात्यांनी सांगितले. मूळात ठरलेल्या किंमतीत प्रत्यक्ष व्यवहार करताना जास्त रक्कम देऊन तात्यांनी त्या मंडळीच्या उपकाराची दाद दिली. शिवाय आणखी एक गोष्ट तात्यांनी केली ती म्हणजे जमीनदार मालकाच्या प्रत्येक घरातील एक व्यक्ती कारखान्यात नोकरी घेतली ही तात्यासाहेब कोरे यांना वाटणारी कळकळ समजून येते, तात्या हे ग्रामीण भागात वाढलेले होते. त्यामुळे त्यांना ग्रामीण भागाचे प्रश्न चांगले माहित होते म्हणून त्यांनी ठरलेल्या रक्कमेपेक्षा जास्त किंमत देऊन जमीन खरेदी केली होती.

जमीनीचा प्रश्न मिटतो न मिटतो तोपर्यंत साखर तयार करणाऱ्या यंत्रसामुग्रीबाबतही वारणा साखर कारखान्याला शासकीय यंत्रणेशी सद्‌हेतुने मोठा लढा द्यावा लागला होता. तात्याच्या सोबत तात्याचे स्नेही रत्नाप्पाण्णा ही होते. १६ जून १९५६ ला एकूण ९ कंपन्याच्या निविदा आल्या त्यापैकी जी.एच. किंवा बकाऊ आर.वूल्फ., जर्मनी या कंपन्याकडे वारणा कारखान्याच्या यंत्रसामुग्रीचा आदेश देण्याविषयी कारखान्याच्या संचालकमंडळाकडे शिफारस केली होती. त्याप्रमाणे कारखान्याच्या संचालक मंडळाने मेसर्स बकाऊ आर.वूल्फ, जर्मनी या कंपनीस दयावे असे ठरविले होते. कंपनी अतिशय चांगली होती म्हणून कारखान्याच्या संचालक मंडळाने त्याची निवड केली होती. पुढे काही अडचणीमुळे या कंपनीची यंत्रसामुग्री मिळू शकत नाही. म्हणून मेसर्स बी.एम.ए.जर्मनी कंपनीची यंत्रसामुग्री घ्यावी असा आदेश मुंबई सरकारकडून देण्यात आला. पण तात्यांचा विश्वास बकाऊ कंपनीवर होता. म्हणून तात्यासाहेब व पंचगंगा कारखान्याचे चेअरमन रत्नाप्पा आण्णा हे यशवंतराव चव्हाण यांना भेटले त्या काळात ते नुकतेच मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले होते. त्यामुळे त्यांनी आपल्या मित्राच्या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी प्रयत्न केले. ही यंत्रसामुग्री मिळविण्यासाठी तात्यासाहेबांना खूप कष्ट पडले. वेळोवेळी शासनाचे निर्णय बदलत

13797
A

होते. कालांतराने किंमतीत वाढ होत होती. पण तात्यांनी बकाऊ कंपनीचेच साहित्य घ्यावयाचे असे ठरविले होते. म्हणूनच पुढील काळात कारखान्याने अनेक उच्चांक वाढले त्याचे मुख्यश्रेय यास कंपनीच्या यंत्रसामुग्रीला आहे. म्हणूनच तात्यांनी ही यंत्रसामुग्रीला प्राधान्य दिले होते. ती मिळविण्यासाठी त्यांना फार कष्ट पडले होते. पण त्या कष्टाचे पुढे चीज झाले. यातच तात्या समाधान मानतात.

अशा प्रकारे यंत्रसामुग्रीसाठी लागणारा आयात परवाना २३ एप्रिल १९५७ ला मिळाला. आयात परवाना मिळण्यास झालेल्या विलंबामुळे यंत्रसामुग्री पुरविणाऱ्या जर्मन कंपनीस द्यावी लागणारी विसर रक्कम व ऋणपत्र मुदतीच्या आत देता आले नाही. त्यामुळे यंत्रसामुग्री आणण्याच्या मुदतीतही फरक झाला. पदरेशी यंत्रसामुग्रीचे पहिले जहाज ब्रेमेन (जर्मनी) हून १३ जानेवारी १९५८ ला निघाले आणि परदेशी मशिनरी घेऊन पहिले ४ ट्रक्स कारखान्याच्या जागेवर १९ मार्च १९५८ ला पोहचले. अशा प्रकारे मशिनरी येण्यास सुरवात झाली. ज्या पध्दतीने भाग भांडवल जमा करण्यासाठी आहोरात्र कष्ट घेतले. त्या पध्दतीने आता कारखाना उभा करण्यासाठी सुध्दा प्रयत्न केले पाहिजेत म्हणून तात्या, घोरपडे, दळवी, जोशी एवढी मंडळी प्रथम कारखान्याच्या जागेवर पत्र्याची एक साधी झोपडी बांधून त्यात राहत होते. सुरवातीच्या काळात नोकरवर्ग फारसा नव्हता. जेवणसुध्दा घरून येत नव्हते तर तेथेच जेवण बनविण्यासाठी एक स्वयंपाकी ठेवला होता. हा माळ ओसाड होता तेथे एक झुडुपही नव्हते. तेथे दिवसा राहायलासुध्दा भीती वाटत होती. कारण हा माळ म्हणजे खूनी, दरोडेखोर लोकांचे राहण्याचे ठिकाण, कित्येक मुडदे हया ओसाड माळावर पडत होते. थोडक्यात अशा भीतीयुक्त वातावरणात ही मंडळी कारखाना उभा करण्यासाठी तेथे राहत होती. आणि त्याशिवाय पर्यायही नव्हता कारखान्याच्या उभारणीचा माल रात्री अपरात्री ट्रकने येत होता. तो उतरून घ्यावा लागत असे, त्यावेळी त्याठिकाणी ही मंडळी नसती तर हा माल उतरून कोण घेणार? घरची मंडळी मात्र अशा वातावरणामुळे त्यांची काळजी

करत असत. दिवसभर त्या माळावर काम करा पण रात्री वस्तीला मुक्काला घरी या असे सांगितले जात असे, पण हे मात्र तेथेच राहत होते. कारखान्याच्या जागेवर झोपडी बांधून राहणारे तात्यासाहेब कोरे हे एकमेव पवर्तक आहेत आज महाराष्ट्रात आणि देशात अनेक सहकारी साखर कारखाने आहेत. पण असा प्रयोग करणारे ते एकमेव आहेत. हे वारणा परिसराचे भाग्यच होय.'

कारखाना उभारणीसाठी मालाची जमवाजमव मोठया जिद्दीने केली होती, लागणारी सगळी वीट मजुर लावून कारखान्याच्या साईटवर बनवून घेतली होती. चुन्याच्या भट्ट्या लावून तो मळून घ्यायचं काम या लोकांनी केले होते. वाळू घेऊन अनेक ट्रक वरचेवर येत असत. दिवसा माल उतरवून घेण्यास मजुर असत पण रात्री येणारा माल या मंडळींना उतरवून घ्यावा लागते असे. अखेर काम सुरू झाले. प्रथम गोडावून बांधून घेतले. जून १९५८ पर्यंत दोन शुगर गोडाऊन्स, ऑफिस इमारती, कारखान्याच्या मुख्य इमारतीचा बराच भाग पूर्ण झाला हे काम लवकर होण्यास हया झोपडीचाच प्रमुख वाटा आहे. कारण तात्यासाहेब व त्यांचे मित्र तेथे राहत असल्यामुळे प्रत्येक कामाला गती येत होती आणि ते वेळेवर पूर्ण होत होते. कारखान्याचे काम वेळेत व्हावे म्हणून काही समित्या निर्माण होत होत्या. हया समितीत संचालकांच्या बरोबर तात्यासाहेबाचे भाऊ नाना उर्फ दिनकर, रामभाऊ घाडगे इ. मंडळी हया संचालक मंडळाबरोबर काम करत होती. प्रारंभी पाणी पुरवठयासाठी कारखान्याच्या कार्यस्थळावरच या विहिरींवर अवलंबून रहावे लागत होते ते पणी कमी पडते म्हणून वारणा नदीतून पाईप लाईन टाकून पाणी आणायचे ठरले आणि १९५९ साली पाणी आले. कारखान्याचे कामकाज जोराने चालू होते. तो कारखाना डिसेंबर १९५८ ला पूर्ण होईल अशी अपेक्षा होती आणि १ जानेवारी १९५९ पासून सुरू होईल अशी अपेक्षा होती, पण भारतात तयार होणारी यंत्रसामुग्री मार्च १९५९ पर्यंत कारखान्याच्या जागेवर येतच होती. काही दिवसांकरिता कारखाना सुरू करता आला असता पण हंगामाच्या अखेरीस ऊसातील साखरेचा उतारा

कमी असतो. त्यामुळे केवळ लवकर कारखाना सुरू करण्याच्या भावनिक आहारी न जाता तात्यांनी संपूर्ण विचार करून त्या हंगामात कारखाना सुरू केला नाही.

कारखान्याचा पहिला बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ १६ फे ब्रुवारी १९५९ ला तात्यासाहेब कोरे यांची पत्नी सौ.सावित्रीबाई कोरे यांच्या शुभहस्ते हा समारंभ झाला. त्यावेळी तात्यासाहेब व त्यांच्या मित्रांना अतिआनंद झाला, कारण ऐवढे दिवस कष्ट करत होते त्या कष्टाला आता यश येणार होते. १ नोव्हेंबर १९५९ ला अखेर ती युगान्तर करणारी घटना घडली. कारखाना सुरू होण्याचा तो पहिला दिवस होता. कार्तिक शुध्द प्रतिपदा म्हणजे त्याला आपण दिवाळीचा पाडवा म्हणतो तो दिवस होय, संचालक मंडळाने मोठया उत्साहाने साजरा करण्याचे ठरविले, वारणा परिसरात एका नव्या सणाचीच जणू मुहूर्तमेढ रोवली जात होती. नामदार यशवंतरावजींना भेटून तात्यांनी हया घरच्या कार्यासाठी दिवाळी पाडव्याचा मुहूर्त वारणा कारखान्याला द्यावा असा आग्रह धरला. हा दिवस दिवाळी पाडव्याचा दिवस पण तो दिवसही यशवंतरावांनी खास राखून ठेवला. यशवंतराव येणार, मुख्यमंत्री येणार ही बातमी वारणा खोऱ्यात चहूबाजूंना सुसाट वेगानं सुटली! ती गावागावात, घरा-घरात पोहचली. हा दिवस म्हणजेच प्रति बेंदूर-सणच, त्यापूर्वी एक महिना तात्यासाहेब कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ५० गावातील प्रमुख कार्यकर्त्यांची एक बैठक घेतली. त्या सर्वांना तात्यांनी आवाहन केले की, 'आपणा सर्व शेतकऱ्यांच्या मालकीचा दोन अडीच कोटीचा कारखाना इथे आता उभा राहतो आहे. त्याच्या शुभारंभासाठी मुंबई राज्याचे लोकप्रिय आणि कर्तबगार मुख्यमंत्री नामदार यशवंतरावजी येणार आहेत हा क्षणआपणा सर्वांच्या जीवनातील फार मोठया भाग्याचा क्षण आहे. हा क्षण तेवढयाच आनंदाने उत्साहाने आपण साजरा केला पाहिजे. त्यासाठी विविध योजना आखू या मात्र हा सर्व सोहळा आपण स्वयंस्फूर्तीनं करावयाचा. यासाठी कारखान्यास खर्चाची तोशीस पडू द्यावयाची नाही.'[१२] कार्यक्षेत्रातील प्रत्येक गावातून ऊस भरून एकेक गाडी समारंभाचे वेळी आणावयाची.

गाडी खूप सजवायची त्या गाडीला जमतील तेवढया-मिळतील तेवढी बैल जोडया लावायाच्या. आणि गावकऱ्यांनीच वाजंत्री आणायची. या सर्व गावकऱ्यांच्यात तात्यानी स्पर्धा लावली, कोणती गाडी अधिक चांगली सजवलेली येते हे पाडव्याच्या दिवसी ठरणार होते. एकेका गाडीला २० बैलांपासून १०० बैलांपर्यत बैल जोडले होते. त्या दिवशी मिरवणुकीची लांबी दोन मैलापर्यंत होती. नामदार यशवंतरावजी व सौ.वेणूताई आणि इतर नेते, कार्यकर्ती मंडळी समारंभस्थळी आले. कारखान्याचे सभासद मोठया संख्येने उपस्थितीत होते समारंभाची सर्व जागा भरून गेली. जवळपास ५० हजार जनसमुदाय जमला होता. कार्यकर्त्यांचा, यशवंतरावजींचा जयघोष होत होता. वारणानगरमध्ये त्यावेळी एका नव्या पर्वाची सुरूवात होत होती. गेल्या चार वर्षाचे परिश्रम त्या दिवशी सार्थक झाले होते.

यशवंतराव व सौ. वेणुताई यांनी मोठया श्रध्देने कारखान्याच्या मोठया यंत्रसामुग्रीची, ऊस टाकायच्या गव्हाणीची पूजा केली त्याच्या शुभहस्ते गव्हाणीत ऊस टाकले. गेले आणि हाच तो श्री.वारणा सहकारी साखर कारखान्याचा शुभारंभ! ज्या तात्यासाहेबांचे स्वप्न १९५२ सालापासून होते ते आता पूर्ण झाले. 'त्यावेळच्या काही लोकांच्या परिभाषेत बोलायचं तर 'सातव्याची चार खुळी नि कोडोलीतला एक वाणी' यांनी उराशी बाळगलेले ते स्वप्न साकार झाले''[१३] वारणा कारखान्याच्या शुभारंभाला पुण्यापासून बेळगावपर्यंतचे अनेक नामवंत समाजधुरीण व राजकारणातले धुरंधर त्यावेळी वारणाकाठी आले होते.

तात्यासाहेब कोरे यांनी या कार्यक्रमातच यशवंतराव चव्हाण एक गोष्ट बोलले ती म्हणजे 'कारखान्याच्या उभारणीने या भागाची आर्थिक उन्नती होणार आहे. पण त्याचबरोबर या परिसराची सांस्कृतिक उन्नती होण्यासाठी या ठिकाणी एक महाविद्यालय व इतर शैक्षणिक उपक्रम सुरू करण्याविषयी माझे स्वप्न आहे''[१४] वारणा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

परिसरातील शेतकऱ्याच्या मुलांना शिक्षणासाठी कोल्हापूर, सातारा, पुणे या ठिकाणी जाणे आर्थिक दृष्टया परवडणारे नव्हते. त्यामुळे या भागातच कॉलेज काढून येथे सांस्कृतिक क्रांती करण्याचे स्वप्न आहे पुढे वारणा विभाग शिक्षण मंडळाची स्थापना करून ते पुरे केले. अशा प्रकारे ग्रामीण भागात कशाची गरज आहे आणि ती कशी पुरी करता येईल हे तात्यांनी ओळखले होते. त्यासाठी स्वतःच्या नेतृत्वाखाली अनेक संस्था स्थापन केल्या आहेत, हे वारणानगर पाहिल्यावर सहज लक्षात येते.

६ नोव्हेंबर १९५९ रोजी म्हणजे कारखाना चालू झाल्यानंतर सहा दिवसानी कारखान्यातून पहिली साखर बाहेर पडली, त्यावेळी तात्यासाहेब सातवे या गावी यशवंत सहाकरी सेवा सोसायटीच्या उद्घाटनाला गेले होते. सातवे गाव म्हणजे वारणा कारखाना उभारण्यासाठी तात्यांच्या बरोबरीने ज्यांनी काम केले ते घोरपडे व जोशी यांचे गाव होय. त्या कार्यक्रमात निरोप आल की पहिली साखर तयार झाली आहे, पहिले पोते भरले आहे, तात्या व मित्रमंडळी तो कार्यक्रम आटपून वारणेला आले. त्या पहिल्या पोत्याचे भक्तिभावाने पूजन केले त्यावेळी त्यांना आनंदाश्रू उभे राहिले होते. त्यानंतर तात्यांनी पहिले काम कोणते केले तर कारखान्यापासून ७ किलोमिटर असणाऱ्या तळसंदे गावच्या देवीला पहिला साखरेचा नैवेद्य समर्पण केला. कारण १९५२ मध्ये तात्यासाहेब मोहिते यांच्या समवेत कारखान्याच्या मुहूर्ताचा पहिला नारळ फोडला होता, त्यावेळी तो प्रयोग यशस्वी झाला नव्हता. त्यानंतर ७ वर्षांनी हा प्रयोग यशस्वी झाला. त्यानंतर तात्यासाहेबांनी कोडोलीतील आपल्या मित्राच्या घरी जावून ती साखर वाटली तशीच कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामदेवतांना भक्तिभावाने अर्पण करण्यात आली. कारखाना चालू झाल्यानंतर लगेच अतिवृष्टी झाली त्यामुळे वारणा परिसरातील रस्ते वाहतुकीस निरपयोगी ठरले. त्यामुळे कारखाना १२ दिवस बंद करावा लागला. पहिलाच गळीत हंगाम असल्यामुळे अनेक अडचणी येत होत्या. मजुरांच्या व वाहतुकीचा प्रश्न मोठया प्रमाणात भेडसावत होता. त्यावेळी शेतकऱ्यांनी आपआपला ऊस कारखान्याला

पाठविण्याचे ठरविले. तात्यासाहेब त्यांचे संचालक मंडळ एक अडचण सोडवते तो पर्यंत दुसरी कोणती तरी अडचण (समस्या) उभी राहत असे. २ फेब्रुवारी १९६० मध्ये कारखाना प्रमुख मशिनरी मध्ये बिघाड झाला. कारखाना बंद ठेवणे भाग पडले. तज्ज्ञ मंडळी बोलवून सुध्दा उपयोग झाला नाही. तेव्हा हा भाग भारतात दुरूस्त होणारा नव्हता तेव्हा तो भाग विमानाने जर्मनीला पाठवावा लागला. तो दुरूस्त होऊन परत येण्यास पाच आठवडे लागणार होते, त्यामुळे कारखाना बंद राहण्याशिवाय गत्यंतर नव्हते. याचा अर्थ पहिला गळीत हंगाम येथेच संपला ! तोपर्यंत ज्या शेतकऱ्यांचा ऊस गाळपासाठी आला होता त्यांना कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली येथील कारखान्याशी संपर्क साधून खपविण्याचा प्रयत्न केला.

अशा परिस्थितीत तात्यासाहेब ना.यशवंतराव चव्हाणांना भेटले. त्यांनी तात्काळ पाऊले उचलली आणि त्यांनी राधानगरी येथील विद्युतशक्ती केंद्रातून विजेची सोय करण्याची योजना आखली, राधानगरीची वीज दिवसभर इतर कारखान्याना दिली जात असे. रात्रीच्या वेळी हा पुरवठा उपभोगला जात नव्हता. तेव्हा रात्रीच्या वेळी आर्थिक पुरवठा केल्याने कारखाना अंशतः चालणे शक्य होणार होते. आणि अगदी बंद पडणारा कारखाना रोज रात्री १० ते ६ पर्यंत चालू ठेवला जात होता. अशा प्रकारे विद्युत शक्तीवर साखर उत्पादनाचे कार्य करण्याची कल्पना याच कारखान्यात प्रथम प्रत्यक्षात आणली गेली. बंद पडलेले टर्बाईन दुरूस्त होऊन परत येई पर्यंत कारखाना बंद होण्याची वेळ आली. आणि २८ मार्च १९६० ला कारखान्याचा पहिला गळीत हंगाम संपविण्यात आला. पहिल्या वर्षी अनेक अडचणी आल्या तरी सुध्दा १२.७२ इतका उतारा पडला आणि ८२,३४३ इतकी पोती साखर तयार झाली. दुसऱ्या वर्षीही उतारा चांगला होता. परंतु तिसऱ्या वर्षी साखर उतारा १३.५८% एवढा देऊ न भारतात प्रथम क्रमांक मिळविला नवा उच्चांक स्थापन केला. त्यानंतर १९६७ पर्यंत वारणा साखर कारखान्याचा साखर उतारा अखिल भारतात प्रथम क्रमांकाचा होता. कारखान्याने 'कारखाना

कार्यक्षमतेत' जागतिक मानदंड निर्माण केला. १९६२-६३ च्या हंगामात 'शुगर लॉसेस' म्हणजे उत्पादन करताना वाया जाणारी साखर, जास्तीत-जास्त वाचविण्याच्या हेतूने घेतलेली यांत्रिक दक्षता, या नैपुण्यापोटी कारखान्याने जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. 'वर्कींग इफिशियन्सी' या विक्रमाचे नाव असून हा विक्रम सतत तीन वेळा वारणा कारखान्याने केला आहे. या विषयी भारतीय संस्थेमध्ये केंद्रीय मंत्री श्री.आण्णासाहेब शिंदे यांनी भारतीय साखर कारखान्यांनी देशाला मिळवून दिलेल्या साधन संपत्तीच्या गौरवाने उल्लेख करताना ते असे म्हटले की, 'महाराष्ट्रातील साखर कारखान्यापैकी श्री वारणा सहकारी कारखान्याने कार्यक्षमतेच्या बाबतीत जगातील साखर कारखान्यांशी मुकाबला करून आपले स्थान उच्च असल्याचे दाखवून दिले आहे. आणि भारताचा नावलौकिक साऱ्या जगात वाढवून ठेवला आहे, उंचावला आहे.'[१५]

वारणा साखर कारखान्याने १९६७ पर्यंत अनेक उच्चांक केले. नाव संपूर्ण देशभर केले याचे सर्व श्रेय वारणा साखर कारखान्याचे कामगार, अधिकारी यांना जाते. कारखान्याचे कार्यकारी संचालक (सेक्रेटरी) नंदकुमार नाईक यांनी सदैव जागरूक राहून हे विक्रम प्रस्थापित केले आहेत. कारखान्याने भागधारकांना ऊसाचा दरही खूप दिला १९६७-६८ या हंगामात प्रत्येक टनास रू २१० रूपये इतका दिला. हा दर संपूर्ण भारतात एक नंबरचा होता.

एका बाजूला कारखाना अनेक उच्चांक प्रस्थापित करत होता. त्याचवेळी दुसऱ्या बाजूला वारणानगर आकारास येऊ लागले होते. हे वारणानगर वसविण्यात प्रख्यात इंजिनियर श्री.आर.ए.पर्वते यांनी मास्टर प्लॅन तयार केला. कारखाना म्हटले की कामगार आले. हया कामगारांना राहण्यासाठी २ किंवा ३ खोल्याची घरे कारखान्याने शासनाच्या मदतीने बांधली अशी २८८ घरे बांधली आहेत. ही घरे, शिपाई व अधिकारी यांच्यासाठी आहेत. अधिकाऱ्यांसाठी वेगळी घरे नाहीत.

शिपाई आणि अधिकारी यांना समान पातळीवर घरे आहेत. सामाजिक समता वारणानगर मध्ये तात्यासाहेब यांनी निर्माण केली आहे. त्याचबरोबर काही कामाकरिता बाहेरून आलेल्या शेतकऱ्याला (सभासदांना) शेतकरी विकास निर्माण केला आहे. वारणानगर येथे काही काळानंतर तात्यांनी वारणा सहकारी बँक, वारणा विभाग शिक्षण मंडळ की जेथे, बालवाडीपासून कॉलेज पर्यंत आणि नंतर अभियांत्रिकीकरणपर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे. सहकारी कोंबडी संघ, ज्या ग्राहक भांडाराचे नाव संपूर्ण देशभर आहे असा वारणा बाझार, वारणा दूध संघ, वस्तिगृहे असा वारणेचा व्याप दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. आज वारणानगरला प्रथमच एखाद्या व्यक्तीने भेट दिली तर एक व्यक्ती काय करू शकते हे कळते.

वारणानगर येथे सर्व गोष्टी चांगल्या आहेत पण सर्वात आकर्षित आहे ती म्हणजे 'वारणा शेतकरी' ही प्रशासकीय इमारत ती पहाताच संसद भवनाची आठवण येते. ही इमारत गोकाकचा सुप्रसिध्द लाल व पांढरा दगड यांनी बांधलेली आहे. कारखान्याचे संपूर्ण कामकाज ज्या इमारतीतून चालते. कोणत्याही साखर कारखान्याच्या प्रशासकीय इमारतीपेक्षा ही इमारत अत्यंत चांगली आहे. असे अनेक मान्यवर मंडळीनी मान्य केले आहे. वारणानगर दिवसें-दिवस वाढतच होते. अनेक इमारती उभ्या राहत होत्या. पण हया इमारतीतून वारणा परिसराच्या विकासाचा ध्यास होता. त्याचबरोबर अनेक बागा, फळे,फुले, झाडे ही वारणानगरची आणखी एक वैशिष्टय, तात्यांनी वारणा नगरला चांगली माणसे आणलीत तर घोरपडे यांनी अनेक झाडे, फळे, फुले आणली.

वारणा नगरमध्ये अनेक कामे चालू होती. पण या कामाना सभासदांची मान्यता आहे की नाही हे पाहणारी गोष्ट म्हणजे निवडणूका होय. १९५६ ते १९६१ पर्यंत सरकार नियुक्त संचालक मंडळ होते. १९६१ साली पहिले लोकनियुक्त संचालक मंडळ अस्तित्वात आले, ही निवडणूक बिनविरोध व्हावी म्हणून तात्यांनी खूप प्रयत्न केले पण

कारखान्याच्या एकूण चार गटापैकी दोन गटात निवडणूक बिनविरोध झाली. तर उरलेल्या दोन गटात तात्याचे उमेदवार निवडून आले. कारखान्याच्या इतिहासात सर्वात चुरशीच्या निवडणूका १९६५ व १९६७ च्या झाल्या. हया निवडणुकीत विरोधक आक्रमक होते. कोणत्याही परिस्थितीत तात्यांचे पॅनेल पराभूत करायचेच या हेतुने ही मंडळी निवडणुकीत उतरली होती. ६५ च्या निवडणुकीत विरोधकांचे दोन गटातून उमेदवार यशस्वी झाले पण तात्यांचे बहुमत कसेबसे टिकले होते. त्यामुळे १९६७ च्या निवडणुकीला खूप महत्त्व आले होते. हया निवडणुकीत तात्यांचे पूर्ण पॅनेल पराभूत होईल असे वातावरण होते. हया निवडणुकीत जिल्हा बँकेतील धुरीण, जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, जिल्हा काँग्रेस नेते, विविध राजकीय पक्षांचे पुढारी या निवडणुकीत तात्यांच्या विरोधात होते. तरीसुध्दा संपूर्ण पॅनेलचा पराभव होईल अशा वातावरणात संपूर्ण विजय मिळाला. सभासदांनी तात्यांच्यावर पूर्ण विश्वास टाकला. त्यानंतर अनेक निवडणूका झाल्या पण १९६५, ६७ च्या निवडणुकींचा रंग वेगळाच होता. तात्यासुध्दा हया निवडणुकीतून खूप काही शिकले.

१९६७ पर्यंत कारखाना सर्व पातळीवर वरच्या क्रमांकाचा होता पण त्यानंतर नैसर्गिक साथ नसल्यामुळे अनेक अडचणी येऊ लागल्या. त्या अडचणी म्हणजे पाण्याचा प्रश्न, १९६८ पासून पुढील पाच गळीत हंगाम दुष्काळग्रस्त गेले, हया काळात वारणा नदीचे पाणी नोव्हेंबर मध्ये संपले. त्यामुळे कारखाना कसा चालवायचा हा मोठा प्रश्न होताच, नदीत पाणी नसल्यामुळे ऊसाचे पीक सुध्दा उत्तम प्रतीचे नव्हते. पण जो ऊस आहे तो गाळप केलाच पाहिजे त्यासाठी पाण्याचा मोठा प्रश्न होता. काही काळ टँकर्सने पाणी पुरवठा करून कारखाना चालवला. त्याचबरोबर कोल्हापूर जवळील केर्ली गावचे सधन शेतकरी श्रीपती बाबूराव पाटील यांनी आपल्या स्वतःच्या जागेत मोटार पंपाने पाणी कारखान्याला दिले. टँकरने पाणी कारखान्याला पुरत नसे. त्याचबरोबर ते वाहतुकीने परवडणारे नव्हते म्हणून, कारखाने पंचगंगा नदीतून पाईप लाईनने पाणी आणले.

कारखान्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला होता पण शेतीस पाणी कमी पडते म्हणून वारणा नदीवर बंधारे घालण्याचे ठरविले. आणि शासनाने त्यास मंजुरी दिली. म्हणून वारणा सहकारी साखर कारखान्याने वारणा नदीवर अनेक बंधारे बांधले आहेत. त्या बंधाऱ्यांना लागणारे पैसे वारणा साखर कारखान्याने आधी खर्च करावेत व नंतर झालेला खर्च शासनाकडून पाच वर्षात मिळू शकेल, त्यानुसार वारणा नदीवर शिगाव ता.वाळवा या ठिकाणी प्रथम २५ फुटी बंधारा बांधल्यामुळे त्या भागात पाण्यासी सोय होईल म्हणून कारखान्याने हे काम हाती घेतले. एकूण १२ लाख रूपये लागणार होते. ते काम पूर्ण करण्यात अनेक अडचणी आल्या पण ते काम वेळेच्या आत तात्यासाहेबांनी पूर्ण करून दाखविले. त्यानंतर, तांदुळवाडी, कोडोली या ठिकाणीही असे बंधारे बांधले. आज संपूर्ण महाराष्ट्रात कोल्हापूर पध्दतीचा बंधारा असा उल्लेख होतो. तो त्या शिगाव बंधाऱ्यामुळेच. तो वारणा कारखान्याने तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्वाखाली बांधला होता. मे १९७४ साली हा बंधारा बांधला गेला.

१९७४-७५ पाण्याचा प्रश्न बऱ्यापैकी सुटला होता. त्यामुळे ऊस उत्पादनात मोठया प्रमाणात वाढ झाली. ऊसाचे दर एकरी उत्पादन सरासरी २७.५८ टन झाले. ऊसाची प्रतही सुधारली. त्यामुळे सरासरी उतारा १२.६५ टक्के पडून वारणा कारखान्याने अखिल भारतात पुनश्चः प्रथम क्रमांक पटकावला. तेथून पुढे ८० पर्यंत साखर उताऱ्यात वारणा साखर कारखान्याने देशात सतत प्रथम क्रमांक मिळविला. तसेच ऊस दराच्या बाबतीतही सातत्याने प्रथम किंवा द्वितीय क्रमांक होता, वारणा साखर कारखान्याने ऊस उतारा, दर, कामगारांना बोनस इ.गोष्टीत भारतात वरचे स्थान निर्माण केले होते. हया कारखान्यांच्या आवश्यक गोष्टी आहेत त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाने भूमिहिन शेत मजुरांसाठी ३० फूट × ३० फूट चा प्लॉट देऊन अशा बेघरांना झोपडया बांधून देण्याची योजना कार्यान्वित केली होती. या योजनेत आपला वाटा उचलण्याचे साखर कारखाना संघाने मान्य केले होते. आणि त्याचप्रमाणे सर्व कारखान्यांनी प्रति टनी

एक रूपया असा निधी उभारला. वारणा कारखान्यानेही असा निधी उभारला. वारणा कारखान्याला एकूण ४३५ घरे बांधण्याचे उद्दिष्ट कोल्हापूर व सांगली दोन्ही जिल्हा कार्यक्षेत्रात मिळाले होते.

११ ते १६ डिसेंबर १९७८ पर्यंत आयोजित केलेल्या पाचव्या खुल्या आशियाई सहकारी व्यवस्थापन परिषदेत कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.नंदकुमार नाईक यांनी 'सहकारातून समृध्द जीवन' (Better living through co-operatives) या विषयावर व्याख्यान दिले. तसेच ऑगस्ट-सप्टेंबर १९७९ मध्ये टोकिओ (जपान) या ठिकाणी इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह अलायन्स तर्फे वरील विषयावर व्याख्यान दिले. त्याचबरोबर श्री.नंदकुमार नाईक यांना इन्स्टिट्युट ऑफ सेल्फ डिफेन्स अँड नॅशनल कॅरॅक्टर अकॅडेमी, नवी दिल्ली या संस्थेच्या सुवर्णपदक वितरण समितीवर सदस्य म्हणून निवड झाली होती. वारणा साखर कारखान्याला अनेक पुरस्कार मिळवून देण्यात तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्वाखाली श्री. नंदकुमार नाईक यांनी कारखान्याचे प्रशासन चालविलेले होते. 'वारणा कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ज्या हायस्कूलचा इयत्ता १० चा निकाल ७५% पेक्षा जास्त लागेल त्यांना ५०००, ७०% पेक्षा जास्त निकाल ज्या शाळेचा लागेल त्यांना ३००० आणि ६०% पेक्षा जास्त निकाल लागेल त्यांना रूपये १५०० याप्रमाणे उत्तेजनार्थ बक्षिसे देण्याची योजना १९८१-८२ पासून चालू केली. तसेच कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील १० वीच्या गुणानुक्रमे पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या येणाऱ्या आणि मागासवर्गीय उत्तीर्ण विद्यार्थ्यात पहिल्या येणाऱ्या अशा विद्यार्थ्यांना अनुक्रमे २००,१५० आणि १०० रूपये बक्षिस देण्यात येते.'[१६]

वारणा कारखान्याने आपल्या विभाग विकास निधीतून १९७५-७६ ते १९८७-८८ अखेर कारखाना कार्यक्षेत्रातील गावात विविध योजनांसाठी अनुदाने दिली. सभासदांना गोबर गॅस प्लँटसाठी सत्तावन लक्ष रूपये देऊन २०६५ प्लँट उभे केले. तसेच

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR


सभासदांना खते, ऊस बियाने औषधे, स्प्रिंकलर, बोरींगसाठी कारखान्याकडून वेळोवेळी मोठया प्रमाणावर अनुदान देण्यात आले आहे. तसेच कारखाना कार्यक्षेत्रातील प्राथमिक शाळांच्या बांधकामासाठी, माध्यमिक शाळांच्या बांधकामासाठी देवालय, आणि मंडप बांधण्यासाठी, तालीम, वाचनालय यांना ३६ लक्ष रूपये अनुदान देण्यात आले. कार्यक्षेत्रात साठ बालवाडया चालविण्यासाठी आणि त्यातील काही इमारतीचे बांधकाम करण्यासाठी १७ लक्ष रूपये खर्च करण्यात आले. त्याचबरोबर रस्ते आणि गटर्स दुरूस्तीसाठी मोठया प्रमाणात कारखान्याने पैसे गुंतविले आहेत. अशा सर्व कामासाठी कारखान्याकडून वेळोवेळी मदत केली आहे.

वारणा नदी बारमाही वाहणारी नदी नव्हती. पण चांदोली प्रकल्पामुळे वारणा नदीत पाणी बारमाही वाहू लागले. त्यामुळे कारखान्याने अनेक काही मोठया व काही छोटया उपसा जलसिंचन योजना राबविल्या. या उपसा जलसिंचन योजनेमुळे कारखान्याच्या कार्यक्षेत्रात पाणी पुरवठा मोठया प्रमाणात होऊ लागला. त्यामुळे कारखान्याला ऊस मोठया प्रमाणात येऊ लागला. पण तात्यांनी केवळ ऊस पिकच शेतकऱ्यानी घेऊ नये असा शेतकऱ्यांना सल्ला दिला. चांदोली प्रकल्पामुळे वारणा नदीत कायमस्वरूपी पाण्याची सोय झाली. त्यामुळे शेतकऱ्यांनी ऊस, फळबाग आणि धान्यपिके व फेरपालटाचे अशी विभागणी करावी असा सल्ला दिला. कारण केवळ ऊस पिकामुळे शेतीचा पोत सुधारू शकत नाही. त्यामुळे उलटून पलटून पिके घ्यावी, म्हणजे शेतीत मोठया प्रमाणात उत्पादन मिळेल हे तात्यानी स्वअनुभवाने सांगितले. तरीसुध्दा उपसा जलसिंचन योजनेमुळे तसेच ऊस पिकाचे महत्व शेतकऱ्यांना पटल्यामुळे वारणा परिसरात मोठया प्रमाणात ऊस पिक घेतले जात आहे. त्यामुळे कारखान्याच्या गाळपक्षमतेवर ताण पडू लागला, शेतकऱ्याचा ऊस तुटल्यापासून लवकरात लवकर गाळप झाले पाहिजे म्हणून कारखान्याची गाळप क्षमता वेळोवेळी वाढविली आहे. कारखाना सुरू झाला तेव्हा केवळ १००० टन गाळप क्षमता होती पण त्यात वेळोवेळी

कशी वाढ झाली आहे पुढे दाखविले आहे. कारखान्याचा पहिला गळित हंगाम १९५९ साली सुरू झाला तेव्हापासून ते आतापर्यंत गाळपक्षमता कशी वाढली आहे ते आलेख क्र.२.१ येथे दर्शविले आहे.(पुढील पानावर)

गाळप क्षमता :- वारणा साखर कारखान्याने ऊसाच्यास उत्पादनात ज्या प्रमाणे वाढ होईल तसेच कारखान्याची आर्थिक क्षमता पाहून वेळोवेळी गाळप क्षमता वाढविली. हा जो तात्यांनी आदर्श घालून दिला आहे तोच पुढे आज वारणासमुहाचे नेते मा.आमदार विनय कोरे (सावकर) हे पुढे चालवित आहेत. आज वारणा साखर कारखाना देशातील एक नामवंत कारखाना म्हणून ओळखला जातो. तो सहकारमहर्षी तात्यासाहेब कोरे यांच्या विधायक नेतृत्वामुळेच.

वारणा परिसरात अनेक उद्योग उभे राहिले होते. ते वारणा सहकारी साखर कारखान्याच्या मदतीनेच, तसेच प्रत्यक्ष कारखान्याच्या बगॅसवर 'पेपर प्लँट' उभा करण्याची परवानगी मिळाली. तो प्लँट लवकरच पूर्ण करून १९८१-८२ या कारखान्याच्या वार्षिक अहवाल पेपर मिलमधून छापला गेला. वारणा पेपर मिलमध्ये, बगॅसपासून तयार झालेला कागद अत्यंत उच्च प्रतिचा आहे. हया प्रकल्पाला एकूण ६ कोटी खर्च आला. आणि यापैकी बरीच गुंतवणूक साखर कारखान्याने स्वनिधीतून केली. हया वारणा कागद कारखान्यात तयार झालेल्या कागदाची प्रत चांगली असून या कागदाला बाजारात चांगली मागणी आहे. प्रतिदिनी २० मे.टन इतकी उत्पादन क्षमता हया कागद कारखान्याला आहे. तात्यासाहेबांनी बगॅसपासून कागद तयार करण्याची कल्पना चांगली आहे. म्हणून हा कारखाना सुरू केला पण वारणा उद्योगात इतर उद्योग जसे भरभराटीत आले आहेत. त्याप्रमाणे हा कागद प्रकल्प नाही. त्याला कारणे आहेत त्यापैकी काही कारणे म्हणजे पाऊस, पर्यावरण, सांडपाणी निर्गत व्यवस्था, खंडित विद्युत पुरवठा, बगॅसच्या वाढलेल्या किंमती, इतर कच्चा मालाच्या वाढलेल्यास किंमती, आणि



गाळप क्षमता
८०००
७०००
६०००
५०००
४०००
३०००
२०००
१०००
०
१०००
२०००
२५००
३०००
४०००
५०००
७५००
१९५९-६०
१९६९-७०
१९७८-७९
१९८१-८२
१९८९-९०
१९९८-९९
२०००-२००१

त्यार कागदाला मिळणारा अल्प भाव इ.कारणामुळे हा कागद प्रकल्प वर्षभर चालवू शकत नाहीत. केवळ ५ ते ७ महिने हा कारखाना चालवला जातो. त्यामुळे हा प्रकल्प म्हणावा तेवढा यशस्वी झालेला नाही. त्याचा परिणाम साखर कारखान्यावर होतो. काळाच्या ओघात हा प्रकल्प यशस्वी होईल अशी अपेक्षा धरावी का? हा मोठा प्रश्न आहे. तात्यासाहेबांना तसेच सध्याच्या नेतृत्वालाही कागद प्रकल्पाने अनेक वेळा अडचणीत आणले, विरोधकांनी बरीच टिकाही केली. तरीसुध्दा वरील काही प्रश्न सुटल्यास हा प्रकल्प यशस्वी होऊ शकतो.

ऊसकरी शेतकऱ्याला ऊसाचा मोबदला योग्य मिळण्यासाठी साखर उद्योगाला, उपपदार्थावर आधारित पूरक उद्योगाची जोड देण्याची गरज आहे. त्यासाठी पेपर प्लँट प्रमाणे डिस्टीलरीचा मार्ग स्विकारला, मात्र हा प्रकल्प उभारताना, कोणत्याही वित्तीय संस्थेचे कर्ज न घेता साखर कारखान्याच्या स्वतःच्या निधीतून, बहुतांशी भांडवल गुंतवून ही उभारणी करण्याचे तात्यासाहेबांनी ठरवले. वारणा कारखान्याला डिस्टीलरीसाठी परवाना मिळाला. पण हया डिस्टीलरीमध्ये दारू न बनविता इतर काही किफायतशीर रसायने बनविण्याचा तात्यांचा संकल्प होता. त्यानुसार १९८५-८६ यावर्षी तात्यांची हया प्रकल्पाची वेगाने उभारणी केली. डिस्टीलरीची दररोजीची उत्पादन क्षमता २५ हजार लिटर आहे. हा प्रकल्प उभा करण्यासाठी दोन कोटी पंचावन्न लाख रूपये इतका खर्च आला. हया डिस्टीलरीत मोलॅसिसचा वापर करून इंडस्ट्रियल अल्कोहोलचे उत्पादन घेतले जाते. त्याचबरोबर डिस्टीलरीकडील स्पॅटवॉश आणि साखर कारखान्यातील प्रेसमड यामध्ये मायक्रो जिवाणू मिसळून प्रक्रिया करून वारणा बायोअर्थ कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प सुरू केलेला आहे. हे कंपोस्ट खत कारखान्यांच्या सभासदांना दिले जाते. असे असले तरी हया डिस्टीलरीचा वापर ७०% इतकाच केला जातो. विद्युत मंडळाकडून वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा व कारखाना आधुनिकीकरणामुळे कमी मिळणारी स्टीम इ.कारणामुळे डिस्टीलरी बंद ठेवावी लागते.

शिवाय इंडस्ट्रियल अल्कोहोलचे उत्पादन केले जाते. हया मालाचे बाजारपेठेत उतरलेले दर पाहता डिस्टीलरीमध्ये लिकर उत्पादन व ॲब्सुलूट अल्कोहोल घेणे अत्यंत आवश्यक आहे. तर असे उद्योग यशस्वी होतील.

चांदोली प्रकल्प हा वारणा साखर कारखान्याला अत्यंत उपयोगी ठरलेला आहे. कारण चांदोली धरण हे वारणा नदीवर बांधल्यामुळे उन्हाळी पाण्याचा प्रश्न मिटला होता. वारणा नदी बारमाही वाहणारी झाली होती. पण नदीतील पाणी जमिनीपर्यंत आणणे हे सर्वच शेतकऱ्यांना परवडणारे नव्हते म्हणून वारणा नदीवर कारखान्याच्या पुढाकाराने म्हणजेच तात्यासाहेबांच्या नेतृत्वाखाली अनेक पाणीपुरवठा योजना राबविल्या गेल्या १९८७ पूर्वीच्या १९ आणि १९८७ नंतर ४० अशा एकूण ५९ पाणीपुरवठा योजना आहेत. याशिवाय काही मोठया योजना कारखान्याच्या व्यवस्थापनाखाली चालू आहेत. त्यामुळे वारणा कारखान्याला ऊ स पुरवठा मोठया प्रमाणात होऊ लागला. त्याशिवाय अनेक नवीन सभासद कारखान्याला ऊस पुरवठा करू लागले. त्यामुळे अनेक नवीन सभासदांत वाढ झाली. त्या वाढीचे प्रमाण दर दहा वर्षीच्या फरकाने दाखविले आहे.

**<u>वारणा साखर कारखान्याचे सभासद</u>**

| अ.न. | सन | सभासद संख्या |
|---|---|---|
| १) | १९५९-६० | ११७८ |
| २) | १९६९-७० | ४८३८ |
| ३) | १९७९-८० | ७७८९ |
| ४) | १९८९-९० | १३५८४ |
| ५) | १९९९-२००० | १९५१९ |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

वारणा साखर कारखान्याचे १९९९-२००० या वर्षात १९५१९ इतके सभासद कारखान्याला ऊस पुरवठा करतात. त्याशिवाय बिगर सभासद सुध्दा कारखान्याला ऊस पुरवठा करतात. वरील सभासद कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळा, हातकणंगले, करवीर, तर सांगली जिल्हयातील वाळवा आणि शिराळा हया तालुक्यातील आहेत. वारणा साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात वरील पाच तालुक्यातील एकूण ८३ गावाचा समावेश होतो. कारखान्याच्या निवडणुकीसाठी एकूण पाच गटात विभागणी केली आहे. प्रत्येक गटातून तीन संचालक निवडले जातात. शिवाय दोन महिला प्रतिनिधी असतात, दोन सेवा सोसायटया गटातून सदस्य निवडले जातात, एक मागासवर्गीय आणि एक दुर्बल घटकातून असे २१ संचालकांमार्फत कारखान्याच्या एकूण कारभार चालविला जातो. असे २१ संचालक दर पाच वर्षांनी निवडले जातात. शिवाय बँक प्रतिनिधी शासकीय प्रतिनीधी हे ही संचालक मंडळात असतात. आणि पदसिध्द सभासद म्हणून कार्यकारी संचालक असतात.

वारणा साखर कारखाना शेतकऱ्यांना ऊस मोबदला म्हणजेच ऊसाला प्रति टनी दर देण्याच्या बाबतीतही सतत आघाडीवर आहे. १९५९ पासून सातत्याने वारणा साखर कारखान्याचा दर देश पातळीवर वरच्या क्रमांकाचा आहे. बऱ्याच हंगामात दर देशात पहिल्या क्रमांकाने दिला आहे. तसेच साखर उतारा देश पातळीवर प्रथम क्रमांक अनेकवेळा मिळविला आहे. तांत्रिक कार्यक्षमता, कामगाराना वेतन, बोनस इ.बाबतीत सुध्दा कारखान्याने आपले नावलौकिक केले आहे. वारणा कारखान्यामार्फत कामगारांना अनेक सुविधा पुरविल्या जातात. तात्यासाहेब कोरे यांनी शेतकरी आणि कामगार डोळयासमोर ठेऊन प्रत्येक गोष्टीचा विचार केला. आणि वारणानगर एक ग्रामीण भाग सर्व दृष्टीने एक आदर्श नगर निर्माण केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकार यांनी हया कारखान्याचा वेळोवेळी गौरव केलाआहे. अनेक पुरस्कार देण्यात आले आहेत.

१९८८-८९ च्या गळीत हंगामातील उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमतेबदलचे वारणा कारखान्याला भारतीय पातळीवरील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. हे पारितोषिक फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज लि.तर्फे देण्यात येते. यामध्ये प्रामुख्याने कारखान्याचे व्यवस्थापन, स्टाफ, कारखान्याचा साखर उतारा, किमान टोटल लॉसेस, कमाल मिल एक्स्ट्रक्शन, ऊस गळीत, कार्यक्षमात इ.निकषांवर देण्यात येते. १९८२ पासून वारणा कारखान्याचा उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमतेबदलचा राष्ट्रीय पातळीवर सातत्याने सन्मान होत आहे. १९८८ च्या गळीत हंगामात दि कौन्सिल ऑफ इंडस्ट्रीज सेप्टी मुंबई यांच्या वतीने कमीतकमी अपघात होणाऱ्या औद्योगिक संस्थेला देण्यात येणाऱ्या 'सेप्टी अॅवॉर्ड' म्हणून वारणा कारखान्याला प्रथम क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले. हे अॅवॉर्ड वारणा कारखान्याला अनेक वेळा मिळाले. वारणा साखर कारखान्याला वेळोवेळी ज्यांनी मदत केली ते भारताचे माजी उप-पंतप्रधान, कृषि औद्योगिक समाजरचनेचे शिल्पकार कै.यशवंतराजवी चव्हाण यांच्या स्मृतिप्रित्यर्थ स्थापन करण्यात आलेल्या ' मा.यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान' च्या वतीने सहकारी संस्थेच्या वैशिष्ट्यपूर्ण कार्याबद्दल दिले जाणारे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक आणि स्मृतिचिन्ह वारणा कारखान्याला सर्वप्रथम मिळाले.'[१७]

वारणा साखर कारखान्याने साखर उताऱ्यात देशात सातत्याने प्रथम क्रमांक मिळविला आहे. तात्यांनी वारणेचे नेतृत्व केले हया काळात त्यांनी वारणा परिसरातील शेतकऱ्यांना अनेक फायदे करून दिले आहेत. शिवाय वारणेमध्ये केलेले कार्य पाहून तात्यांना महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाच्या दोन वेळा अध्यक्ष होण्याचा मान मिळाला. त्या काळात त्यांनी नवीन कारखान्याचा तसेच आजारी कारखान्याना चांगली मदत केली. म्हणून '२४ फेब्रुवारी १९७९ च्या अंकात तात्यासाहेब कोरे यांचे विधायक कर्तव्य' असा अग्रलेख लिहिला गेला'[१८] तसेच साखर उद्योगात उल्लेखनीय कार्याबद्दल इचलकरंजी येथील फाय फौंडेशनचा पुरस्कार तात्यांना देण्यात

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

आला. तात्यांनी आपल्या विधायक नेतृत्वाने वारणा साखर कारखान्याला जगात एक वेगळा दर्जा निर्माण करून दिला. वारणा परिसराचे भाग्यविधाते तात्यासाहेब कोरे होते म्हणून एकाच व्यक्तीच्या नेतृत्वाखाली वारणेचा विकास झाला.

वारणेच्या स्थापनेपासून म्हणजेच १९५६ ते १९९४ पर्यंत अनेक विरोधकानी तात्यांना वारणेचे नेतृत्व काढून घेण्याचा प्रयत्न केला होता. परंतु वारणा परिसरातील सभासद हे सुज्ञ व जाणकार आहेत. काय चांगले आहे, शेतकऱ्यांच्या हित जपणारा नेता कोण आहे? ग्रामीण विकास कोणापासून होणार आहे हे त्यांना माहित होते. म्हणून अनेक वादळात तात्यांचे नेतृत्व टिकून राहिले. म्हणून वारणेचा विकास झाला. म्हणूनच वारणेला भेट देणाऱ्या अनेक मान्यवर व्यक्तींनी म्हटले आहे की, १०० खेडयात तात्यांच्यासारखे नेतृत्व निर्माण झाले तर भारत जगात सर्वात बलाढय देश म्हणून निर्माण होईल. त्यासाठी वारणा नगर प्रथम पाहिले पाहिजे.

## संदर्भ सूची


१) प्रा.डॉ.सुभाष पाटील दक्षिण महाराष्ट्रातील साखर कारखान्याच्या निवडणूका शोध व बोध - शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद ८ वे अधिवेशन, पृ.५५

२) उपरोक्त पृष्ठ क्र.५६

३) उपरोक्त पृष्ठ ६१

४) उपरोक्त पृष्ठ ६४

५) मी एक कार्यकर्ता 'विश्वनाथ आण्णा तथा तात्यासाहेब कोरे षष्ठयब्दिपूर्ती समारंभ समिती प्रकाशन १ डिसेंबर १९७४ पृष्ठ क्र.१२२

६) उपरोक्त पृष्ठ १२६

७) उपरोक्त पृष्ठ १२८

८) मा.श्री.वि.आ.तथा तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव स्मरणिका एप्रिल १९९० पृष्ठ क्र.२

९) मी एक कार्यकर्ता 'विश्वनाथ आण्णा तथा तात्यासाहेब कोरे षष्ठयब्दिपूर्ती समारंभ समिती प्रकाशन १ डिसेंबर १९७४ पृष्ठ क्र.१४०

१०) वारणा सहकारी साखर कारखान्याचा प्रथम वार्षिक अहवाल दि.३०-६-१९५६ पृष्ठ क्र.४

११) मी एक कार्यकर्ता 'विश्वनाथ आण्णा तथा तात्यासाहेब कोरे षष्ठयब्दिपूर्ती समारंभ समिती प्रकाशन १ डिसेंबर १९७४ पृष्ठ क्र.१५९

१२) उपरोक्त पृष्ठ १७०

१३) उपरोक्त पृष्ठ १७२

१४) उपरोक्त पृष्ठ १७२

१५) उपरोक्त पृष्ठ १७८

१६) मी एक कार्यकर्ता 'विश्वनाथ आण्णा तथा तात्यासाहेब कोरे षष्ठयब्दिपूर्ती समारंभ समिती प्रकाशन(उत्तरार्ध) १ मे १९९० पृष्ठ क्र.९६

१७) उपरोक्त पृष्ठ १२९

१८) उपरोक्त पृष्ठ ५०

****